९८८८
म. ग्र सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र.

ने ९७३ स्था ९८८८

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(णें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.

पु० नाव — विल्वमंगल
के — वि. वा भि.
विष — नाटक

९७३
नाटक

... ED BY THE DAKSHINA PRIZE COMMITTEE.

# बिल्वकनाथ.

## (एक वैरागी)

हें नाटक

विद्याधर वामन भिडे, बी. ए.

अहमदनगर हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर

आणि

इसापनीतीच्या पद्यात्मक भाषांतराचे कर्ते

ह्यानीं केलें

तें

मुंबई येथें

'नेटिव्ह ओपिनियन' छापखान्यांत छापिलें.

इसवी सन १८८८.

किंमत ८ आणे, [illegible]. हा. १ आणा.

(पुस्तकें ग्रंथकर्त्याकडे विकत मिळतील.)

[ हे पुस्तक १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिष्टर केलें आहे ]

"" ७१

# नाटकांतील पात्रें.

श्री. बाजीराव पेशवे.

बाळकृष्णपंत ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर.

सगुणाबाई .... त्यांची पत्नी.

हरिपंत .... त्यांचा मुलगा.

अंतोपंत .... हरिपंताचा सोबती.

रामभट .... तात्यासाहेबांचा विश्वासू नोकर.

मोतीलाल .... पुणें शहरांतील एक सावकार व तात्यासाहेबांचा मित्र.

बिल्वकनाथ .... एक बैरागी.

पिलंभट, बजंभट, नारोबा कोतवाल, खिजमतगार वगैरे.

---

स्थळ.

पुणें, आणि सातारा.

# बिल्वकनाथ.

## अंक १ ला.

### प्रवेश पहिला.

स्थलः—पुणें आदितवार पेठ, मोतीलालाचे घराची मागची बाजू.

**रामभट**—( मोतीलालाचे घराचे पिछाडीस ) अहा हा ! दैवाची गति किती विचित्र आहे! तात्यासाहेबांचे पदरीं आज वीस वर्षें मी चाकरीस आहें, परंतु त्यांचें कधीं गैरवर्तन माझ्या दृष्टीस पडलें नाहीं. त्यांचा मुलगा बदचालीचा असतांही त्याला कितीदां सावकाराच्या कचाट्यांतून त्यांनीं सोडविलें आहे! आपल्या कुळांशीं तरी ते किती ममतेनें वागत असत! कोणी आंधळा पांगळा भेटला कीं कांहीं तरी त्याला दिल्याशिवाय ते पुढें पाऊल टाकीत नसत. कोणी मनुष्य त्यांचेकडे आला, आणि ह्मणाला कीं मला धोतर किंवा दुसरें कांहीं पाहिजे, कीं ते लागलेच त्याच्या हातावर रुपया आठ आणे कांहीं तरी ठेवीत. कोणा एखाद्यास कर्ज झालें असलें, आणि तें त्याच्यानें फेडवत नाहीं असें त्यांस कळलें, कीं त्यास थोडी तरी मदत केल्याशिवाय ते रहात नसत. तेव्हां अशा प्रकारच्या सद्गुणी पुरुषानें पांच सात हजारांकरितां खोटे कागद

करावे, हें अगदीं संभवत नाहीं. अलीकडे सुमारें पं-धरा दिवस अंतोपंत आणि आमचे धाकटे महाराज हरिपंत यांची विशेष सलगी दिसत होती. अंतोपंत हरिपंताचे खोलींत मध्यरात्र उलटे तोंपर्यंत त्यांच्याशीं गुजगोष्टी बोलत असे. मला कधींच ही शंका येऊन चुकली होती. तर तसें कांहीं असेलसें वाटतें. परंतु कितीं केलें तरी ही केवळ शंकाच, खात्रीनें कांहीं सांगवत नाहीं. सरकारचे शिपाई वाड्यांत आल्यावर व तात्यासाहेबांस कां धरणार हें समजल्यावर त्यांची आणि माझी बोलाचाली होण्यास वेळ सांपडता, तर त्यांचा तर्क कसा धांवतो हें समजलें असतें. परंतु त्या धांदलींत वेळ कसचा? आणि काय कसचें? वहिनीबाईस मोती-लालाचे घरीं पुण्यास गुप्तपणें घेऊन जा इतकें काय तें मला सांगण्यास त्यांस वेळ सांपडला; त्यावरून मी वहिनी-बाईसह मोठ्या शर्तीनें चोरजिन्यानें बाहेर पडलों, आणि ताबडतोब पुण्यास येऊन त्यांस मोतीलालाचे घरीं ठेविलें. आतां कोठें जावें बरें? अरे, पण मी विचार कसला करितों? तिकडे तात्यासाहेबांची स्थिति काय आहे हें आपणास आधीं कळलें पाहिजे. तर आतां सातान्याकडेसच तावडतोब जावें. (चालूं लागतो) अरे, पण अंतोपंत इकडे कोणीकडे? बरें त्यास चुकवून असें इकडून निसटून जावें. (जाऊं लागतो.)

**अंतोपंतः**–(त्याला पाहून) कां रामभटजी इकडे कोणीकडे आपली स्वारी इतक्या रात्रीं?

**रामभटः**–(आपल्याशीं) अरे, या मादरचोदानें

तर मला पाहिजे. आतां याचा कसा परिणाम लागेल कोण जाणें? ही स्वारी तात्यासाहेबांचें कांहीं हित चिंतीत नाहीं.

**अंतोपंतः**–(रामभट लवकर बोलत नाहीं असें पाहून मनांत) यामध्यें कांहींतरी गूढ असलें पाहिजे. एरवीं यास उत्तर द्यावयास इतका वेळ कां बरें लागता? (मोठ्यानें) कां रामभटजी, मी तुह्मांस विचारिलें तुह्मी इतक्या रात्रीं इकडे कोणीकडे?

**रामभटः**–मी-मी-मीः-या घरापासून थोडक्याच अंतरावर पासोड्यामारुतीचें देउळ आहे, तेथें देवाचे दर्शनास गेलों होतों, तो आतां परत चाललों आहें.

**अंतोपंतः**–इतक्या रात्रीं पासोड्यामारुतीचे देवळांत?

**रामभटः**–मी लहान असतां माझ्या अंगावर पिवळे चट्टे उठत असत. ते कांहीं केल्यानें बरे होईनात. तेव्हां माझ्या आईनें मारुतीस नवस केला होता कीं, हे चट्टे नाहींसे झाल्यावर पांच वर्षांनीं माझा मुलगा शनवारीं रात्रीं येऊन पांच प्रदक्षिणा घालून सोन्याचीं शंभर रुईचीं पानें करून वाहील. तो नवस फेडण्याकारितां आलों होतों.

**अंतोपंतः**–[मनांत] या स्वारीनें तर खूप बात झोंकून दिली. (मोठ्यानें) बरें, आतां कोणीकडे चालला आहांत?

**रामभटः**–सातार्‍याकडेस.

**अंतोपंतः**–मला देखील तिकडेच जावयाचें आहे.

बरी आपली गांठ पडली. रात्रीची वेळ आहे. तुह्मी मला सोबत व्हाल आणि मी तुह्माला.

**रामभट**:-( मनांत ) ही व्याध शिंची चिकटली मागाला !

[ अंतोपंत आणि रामभट चालूं लागतात ]
( ते वाटेनें एका लहानशा झाडांजवळ येतात. अंतोपंत शीळ घालतो )

**रामभट**:-( मनांत ) येथें कांहीं तरी दगा आहे.

( अंतोपंत रामभटास गचांडी देऊन त्यास खालीं पाडतो आणि त्याच्या उरावर बसतो इतक्यांत दुसरे दोघेजण येतात.)

**अंतोपंत**:-अरे पहातां काय, बांधा याच्या मुसक्या सटकन. ( सदोबा येऊन रामभटाचे पाय बांधूं लागतो. रामभट त्याचे पोटावर एक सपाटून लाथ मारतो. सदोबा कांहीं अंतरावर उताणा पडतो. दुसरा साथी रामभटाचे हातास दोऱ्या बांधूं लागतो. रामभट त्याच्या मुसकटांत मारतो. तो घुणघुणा फुटून दूर अंतरावर जाऊन पडतो. मग रामभट अंतोपंतास आपल्या छातीवरून ढकलून देऊन उठतो आणि पळून जातो.)

**अंतोपंत**:-( रामभट हातचा सुटून गेला ह्मणून रागावून ) अरे ए मादरचोदानों सोधा कोठें रामभट गेला तो. [ सारे सोधूं लागतात रामभट सांपडत नाहीं ह्मणून हिरमुष्ट होऊन परत येतात. ]

**अंतोपंत**:-( रागानें ) अरे ए सदोबा, मी रामभटाचे छातीवर बसलों असतां तुह्मा दोघांच्यानें त्यास बांधवलें नाहींना ? छीः तुमची !

**सदोबाः**–( रामभटानें आपणास लाथ मारल्यांची शरम दाबून टाकून मर्दुमकीच्या बाण्यानें ) अंतोपंत, त्या गुलामाची काय पाड आपल्या तिघांपुढें ? मी येकला असतों तरी बी त्याला बांधुन टाकला असता. तुह्मी काय मला कमी समजतां कीं काय? मगाशी वाईच माझा पाय चुकला आन माझा इत्रांक गेला म्हुन, न्हाय तर रामभट आपल्या हातामंधून सुटला नसता.

**भिकोबाः**–( रामभटानें आपल्या मुसकुटांत मारली ह्मणून वाटत असलेली शरम दाबून टाकून मोठ्या वीरश्रीनें ) अंतोपंत, अव्ह रामभट काय किडा! त्येला मी येकट्यानें बी चिरडुन टाकिला असता. पन् काय कराव हो ! माझ्या हाताचा शिर त्याच येळीं लचकली म्हून माझा न्येम चुकला. न्हाय तर ! रामभट रामभट ह्मणजे कोन ?

**अंतोपंत**–( खोट्या वीरश्रीनें ) मी एकट्यानें देखील त्याला बांधला असता हो, पण त्यानें मला असा कांहीं अवचित हिसडा दिला कीं मी खालींच पडलों. पण ए सदोबा आणि ए कावळ्या, तुह्मीं दोघांनीं घात केलात.

**सदोबाः**–तुह्मी रामभटाचे पोटावरून खालीं पडला नसता ह्मंजे मी पुन्हा पर्यत्न करूनशेनी त्याचे पाय बांधले असते. मी कांहीं कमी आहे अस समजू नका.

**भिकोबाः**–खरंच राव, तुमी रामभटाचे छातीवरून खालीं पडलांत म्हून घाण झाली. न्हाय तर मीबी पुन्हा पर्यत्न करूनशेनी त्येचे हात बांधले असते.

**अंतोपंत**:—अरे ए गाढवांनों मी त्याच्या छातीवर बसलों होतों, तेव्हां काय दिवे लावलेत, उगीच मला दोष देता ते. सारें काम विनसलें तुह्मामुळें—

[ ते तिघे याप्रमाणें एकमेकांवर चरफडत राहतात. ]

**अंतोपंत**:—बरें, आतां झाली गोष्ट ती झाली. एकमेकांवर चरफडून काय उपयोग ? आपण साताऱ्याहून आलों रामभट आणि सगुणाबाई यांस पकडण्यासाठीं; रामभट तर गेला हातचा निसटून. आतां सगुणाबाईस शोधण्याच्या उपायास लागूं.

**सदोबा**:—त्या कुठें आहेत याचा कांहीं तुह्मासनी पत्ता हाये का ?

**अंतोपंत**:—रामभटाची आणि माझी गांठ पडली ती आदितवारांत मोतीलालाचे घराचे मागच्या दरवाज्याजवळ; आणि मोतीलाल तात्यासाहेबांचा विश्वासू मुनीम आहे. तर मला वाटतें, आपण आतांच्या आतां तिकडे जावें. ह्मणजे आपणास सगुणाबाई सांपडेल. कांहीं दिवस लोटूं दिल्यावर मोतीलाल कदाचित त्यांना दुसरीकडे ठेवण्याची तजवीज करील. तात्यासाहेबांच्या घराची बुधवारीं जेव्हा जप्ती झाली तेव्हां अजमास केल्याप्रमाणें कांहींच चीजवस्त सांपडली नाहीं. मला वाटतें सारी चीजवस्त तात्यासाहेबांनीं रामभटाबरोबर पाठवून मोतीलालाचे स्वाधीन केली असावी. ( हळू स्वरानें आणि मोठ्या सलगुतीच्या नात्यानें ) अहो भिकोबा आणि अहो सदोबा, मला वाटतें आपण तर्क करितों त्याप्रमाणें जर कांहीं तात्यासाहेबांचें द्रव्य मोतीलालाचे घरीं सांपडलें, तर पांच

पांचशें रुपये तुह्मां दोघांना देईन; पण तुह्मीं मात्र दोघां-नीं मला मनापासून मदत केली पाहिजे. आणि द्रव्य सांपडलें, तर ती गोष्ट हरिपंतापासून अगदीं गुप्त ठेविली पाहिजे.

**सदोबा** आणि **भिकोबा**:—आमच्याकडून याला ना न्हाय.

**अंतोपंत**:—तर मग मी तुह्माला पांच पांचशें रुपये खचित बक्षिस देईन. ( मनांत ) मी असा वस्ताद आहें कीं त्या द्रव्यापैकीं तुमच्या हातीं एक कवडी देखील पडूं द्यावयाचा नाहीं.

**सदोबा** आणि **भिकोबा**:—( मनांत ) पैका गव-सूं दे तर खरा. मग आम्हां दोघांपुढें तुझी योकटयाची काय बिशाद लागली आहे? ( मोठ्यानें ) बरें, सगुणा-बाई सांपडल्या मंजी त्यांसनी कुणीकडे घेऊन जायाचें याचा कांहीं तुह्मी इचार केला हाय काय ?

**अंतोपंत**:—विचार कसचा? नारोबा कोतवालाच्या हवालीं करावयाच्या. आतां येथें फार वेळ बोलत बसतां कामा नये. चला मोतीलालाचे घराचे मागचे बाजूस. त्या घराची सर्व रचना, गुप्त तळघरें वगैरे मला माहित आहेत. मी एक दोन महिन्यांच्या मागें हरिपंतांबरोबर त्यांच्या घरीं गेलों होतों, तेव्हां मोतीलालानें सर्व घर आह्मांस दाखविलें होतें. चला तर आतां.

( चालूं लागतात. )

## प्रवेश २.

स्थळ—मोतीलालाचे घराची मागची बाजू.

**अंतोपंतः**—अरे, भिकोबा, तूं आम्हां सर्वांमध्यें जास्ती उंच आहेस. तर तूं या भिंतीजवळ उभा रहा. आणि सदोबा माझ्या अंगावरून चढून पलीकडे उडी टाकील. ( सदोबाकडे पाहून ) सदोबा पलीकडचे बाजूस गवताची गंजी आहे. तिच्यावर तुझी उडी पडेल आणि तुला इजाही व्हावयाची नाहीं. पण सांभाळहो, समोरच उडी मार, नाहीं तर तुझ्या उजव्या बाजूस विहीर आहे त्यांत पडशील बिडशील एखादा.

( भिकोबा भिंतीशीं उभा राहातो. सदोबा त्या दोघावरून चढून पलीकडे उडी मारतो. मग अंतोपंत भिंतीवर चढतो, आणि खालीं धोतर सोडतो त्याला धरून भिकोबा भिंतीवर चढतो.)

**अंतोपंतः**—माझ्या मागून तुह्मी दोघेजण असे इकडून या. ( चालूं लागतो ) हें चोर तळघराचें दार. ( हलून ) हें उचकटा ह्मणजे आपण सारे आंत जाऊं. सगुणाबाई बहुत करून याच तळघरांत असेल. ( दार उचकटतात.)

**अंतोपंतः**—या असे इकडून. ( मनांत ) अरे येथें तर कोणी दिसत नाहीं. पण दिवा मात्र टिकटिक जळत आहे. ( चालतो ) अरे माझ्या पायांखालीं कांहींसें फळीसारखें वाजलें. ( खालीं वाकून ) हें एक चोर दार असेल. हें कांहीं आपल्याला मोतीलालानें दाखविलें नव्हतें. (उघडतो) येथें खालीं थोडासा उजेड आहे

आणि पलंगावर कोणी स्त्री निजली आहे. ( शिडीनें उतरतो ) सदोबा आणि भिकोबा, या खालीं. [ अंतोपंत त्या स्त्रीचे केस मागें सारतो, तों सगुणाबाई त्याच्या दृष्टीस पडते. ती ओरडते इतक्यांत अंतोपंत तिच्या तोंडांत बोळा घालून बांधतो. मग ते तिघेजण एका धोतरांत तिची मोटली बांधतात.]

**अंतोपंतः**–भिकोबा हें मोटकें घेऊन तूं वर जा. आह्मी तुझ्यामागून येतों. (भिकोबा शिडी चढूं लागतो)

[अंतोपंत गादीवर चढून पाहतो, तों जवाहीर वगैरे अमोल्य पदार्थ त्यास दिसतात. ते धोतरांत गुंडाळून सदोबा जवळ देतो, आणि ह्मणतो] चल सदोबा, आतां आपण जाऊं.

[ अंतोपंत आणि सदोबा शिडी चढून वर जातात. मग तिघेजण भिंतीजवळ जाऊन धोतर खालीं सोडून धरून उतरतात. ]

**अंतोपंतः**--चला आतां सदोबा. कोतवालाचे घरीं जाऊन सगुणाबाईस त्याचे स्वाधीन करूं. [ जातात. ]

---

## प्रवेश ३.

स्थळः–नारोबा कोतवालाचे घरांतील एक खोली.

**सगुणाबाईः**--शिव, शिव, काय प्रसंग हा आह्मावर गुदरला आहे. देवा ! आह्मीं असा काय तुझा अपराध केला होता ह्मणून हें संकट तूं आह्मावर आणिलेंस ? प्राणनाथ, इतके सद्गुणी असतां त्यांणीं थोडक्यासाठीं बनावट खतें केलीं ही गोष्ट होईल तरी कशी?

त्यांची आतां काय अवस्था असेल! त्यांनीं मला निवा- ऱ्याचे जागीं ह्मणून मोतीलालाचे घरीं पाठवून दिलें, परंतु मी तेथें येऊन एक घटका झाली कीं नाहीं तोंच अंतोपंत आणि दोन रामोशी असे तिघेजण आले आणि त्यांनीं मला धोतरांत गुंडाळून येथें आणून टाकिलें. देवा, मला येथें घेऊन येणाऱ्या लोकांच्या रानवट आचरणावरून त्यांनीं माझा छळ करण्याकरितां येथें मला आणून टा- किली असावी. मी कोठें येऊन पडलें? हें घर कोणाचें? आतां पुढें माझी वाट काय होणार? शिव, शिव! मी अवला या संकटांतून कशी मुक्त होऊं? अरेरे! प्राण- नाथांची आतां काय अवस्था असेल? रामभटांनीं साताऱ्यास जाऊन प्राणनाथांस मुक्त करण्याची कांहीं तरी खटपट करीन, आणि तिकडचा बंदोबस्त सर्व झाला ह्मणजे तुह्मांस कळविण्यास येईन, ह्मणून मला सांगितलें. पण ते पुण्यास आल्यावर मी मोतीलालांचे घरीं दृष्टीस पडलें नाहीं, ह्मणजे त्यांची अवस्था काय होईल? मोतीलाल उद्यां सकाळीं माझ्याकडे विचार- पूस करण्याकरितां येतील आणि मी तळघरांत नाहीं असें पाहून त्यांना किती दुःख होईल? अरेरे! देवा, काय दुःसह प्रसंग हा आह्मावर आणलास! (मूर्च्छा येऊन प- डते, कांहीं वेळानें सावध होऊन) माझें मन मला सां- गतें कीं येथें राहून मजवर कांहीं तरी अनर्थ ओढवेल. तर येथून पळून जाण्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे. (उठून आजूबाजूस पाहून) या खोलीस एकच दार दिसतें. (दाराजवळ जाऊन) अग बाई! याला आंतून कडी देखील नाहीं! कोणी दुष्ट आला तर माझी अव-

लेची काय स्थिति होईल ? बरें, या दाराच्या पाठीमागें काय आहे तें पाहावें. (दार ढकलून) याला तर बाहेरून कडी आहे. (इतक्यांत बाहेर कुलपांत किल्ली वाजलेली ऐकून,) कोण बरें इतक्या रात्रीं माझ्याकडे येत आहे? कोणीतरी दुष्ट, मज अबलेचा छळ करण्याकरितां येत असेल! (कोयंड्यांतून कुलूप काढल्याचा आवाज ऐकून) आपण लांब जाऊन उभें राहावें. ( खोलीच्या दूरच्या कोपऱ्यांत जाऊन उभी राहते )

**नारोबा कोतवाल**:—( दार उघडून आंत येऊन ) बाई तुह्मी उभ्या कां राहातां ? बसा या जाजमावर.

**सगुणाबाई**:-परपुरुषाचेपुढें स्त्रियांनीं उभेंच राहून बोललें पाहिजे.

**नारोबा**:—बाई, यजमानाचेपुढें चाकरांनीं उभें राहावें हें योग्य आहे, पण चाकराचेपुढें जर यजमान उभा राहील तर तसें करणें त्यास शोभेल काय ? बाई, मी तुमच्या चरणाचा दास आहें. माझ्यापुढें तुह्मी उभ्या राहू नका.

**स० बा०**:—तुह्मी कोण?—येथें कशा करितां:—

**ना० को०**:—प्रिये, मी येथें कशाकरितां आलों हें तुला सांगणें नको. तुझें मुख कसें पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें आल्हादकारक आहे. तुझे डोळे भ्रमराप्रमाणें काळे भोर आहेत. तुझे केश मोराच्या पिसाऱ्याप्रमाणें लांब आणि तकतकीत दिसत आहेत. तुझे दांत मोगऱ्याच्या कळ्याप्रमाणें बारीक बारीक आणि पांढरे शुभ्र दिसत आहेत. तुझी अंगकांति कशी गौरवर्ण आहे.

तुझ्या अशा सुंदर शरीराकडे पाहिलें ह्मणजे एकदां तुला दृढालिंगन द्यावें असें वाटतें.

स० बा०:—महाराज, मी गरीब अबला आपणास शरण आलें आहे तर मला सोडून द्यावें.

ना० को०:—तुझ्या ह्या सुंदर मुखाकडे पाहिलें ह्मणजे तुझ्या अधराचें चुंबन करावेंसें वाटतें.

स० बा०:—महाराज, मी तुह्मास दोन्ही हात जोडून विनवणी करितें कीं, असलें बोलणें माझ्याशीं आपण लावूं नका. जर तुह्मांस ईश्वराची भीति वाटत असेल तर मज अनाथेचा असा छळ करूं नका. आणि लवकर माझी सुटका करा.

ना० को०:—प्रिये, तूं मला प्राप्त होईपर्यंत मला ईश्वराची देखील भीति वाटावयाची नाहीं. तर प्रिये, तूं माझ्याशीं राहण्यास कबूल हो. तुला मी फार ममतेनें वागवीन. तूं मला वश झालीस ह्मणजे तुझ्या सौख्यास पारावार राहणार नाहीं असें समज. मी आपलें कोतवालीचें काम सोडून देऊन जमीनजुमला वगैरे सर्व विकून टाकीन. मग तूं आणि मी एका दूर ठिकाणीं जाऊन राहूं. तेथें तुला बसायास पालख्या, मेणे हवे तितके मिळतील. तुला नेसावयास जरीचीं लुगडीं व तुझ्या तैनातीला हव्या तितक्या दासी मिळतील. एकंदरींत तुझ्या सौख्यास ज्या ज्या गोष्टी लागतील त्या त्या गोष्टी मी तुला पुरवीन, कारण मी गर्भश्रीमंत आहें. माझ्याशीं तूं स्त्रीप्रमाणें राहावयास कबूल मात्र हो.

स० बा०:--चांडाळा तोंड भाटप. तुझ्या गोड गोड भाषणांनीं मी तुला कधीं भुलणार नाहीं.

ना० को०:--(तिच्याकडे आनंदानें पाहत राहतो) प्रिये, तू रागावली आहेस तरी किती सुरेख दिसत आहेस! प्रिये, तुझें रागाचें भाषण तुझ्या अधराचें एकसारखें चुंबन घेऊन बंद करावेसें वाटतें. तू जे हात मला झिडकारण्याकरितां मजकडे उभारीत आहेस ते माझ्या बाहुपाशांत अडकावून टाकावेसें वाटतें. (जवळ जाऊं लागतो.) प्रिये—

स० बा०:--अधमाधमा तूं पुढें एक पाऊल टाकलेंस किंवा तोंडानें एक वाईट शब्द बोललास तर मी एकदम जीव देईन. मी जेव्हां घराचे बाहेर पडलें तेव्हांच माझ्या लक्ष्यांत येऊन चुकलें कीं, मी व्हाल्याशिवाय जगांत पडणार आणि जगांत तुजसारखे पाषाणहृदयी, चांडाळ, दुष्ट मांगडे असावयाचेच. यासाठीं मी आपल्या मंगळसूत्रांत विष घालून ठेविलें, अशासाठीं कीं तुझ्यासारखे माझा छळ करूं लागले कीं विष खाऊन प्राण सोडावा. तर दुष्टा मुकाट्यानें आलास तसा चालता हो. एक बोटभर जर पुढें आलास तर तुझ्या डोकीवर स्त्रीहत्येचें पातक बसेल. [मंगळसूत्र तोंडाजवळ धरिते.]

ना० को०:-[तिच्याकडे आश्चर्यानें पाहतो] प्रिये? तूं जात्या भित्री आहेस. आज माझ्या बोलण्यास तूं रुकार दिला नाहींस तर उद्यां तरी देशील. आतां, मी जातों, आणि उद्यां पुनः यावेळीं येईन, तेव्हां तूं माझी

इच्छा अमान्य करणार नाहींस अशी माझी खात्री आहे. [ दारांतून बाहेर जाऊन ]

आजपर्यंत मीं शेंकडों स्त्रियांस भुलाविलें. परंतु ह्या सगुणाबाईप्रमाणें पातिव्रत्यरक्षणास इतकी तत्पर स्त्री अजूनपर्यंत मीं पाहिली नाहीं काहीं स्त्रियांच्या सौंदर्याचें वर्णन मीं केलें, तेव्हां त्या खुलून गेल्या, आणि त्यांचा ताठा नाहींसा झाला. कित्येकांशीं मीं प्रेमाचें भाषण केलें त्यानें त्या वश झाल्या. कित्येक स्त्रियांस दासदासी, पालख्या, मेणे, डागडागिने वगैरे ऐश्वर्याच्या गोष्टींनीं भूल पाडली. परंतु सगुणाबाईनें कशासच दाद दिली नाहीं. आणि आपलें पातिव्रत्यरक्षण करण्याविषयीं जेव्हां तिचे सारे उपाय हरले तेव्हां तर ती विष खाऊन प्राण टाकण्यास सिद्ध झाली. शाबास ! तुझी शाबास! बरें, पण काय चिंता आहे? ( आवेशानें ) आज नाहीं आणखी आठ दिवसांनीं तुझा ताठा नाहींसा होईल. आतां तूं माझ्या तावडींत सांपडली आहेस. जाशील कोठें? ( जातो )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ—सातारा, तात्यासाहेबाचे घरातील हरिपंताची खोली.

**हरिपंतः**—हरहर ! हरहर ! मी किती अधमाधम आहे. मी आपल्या लहानपणापासून तों आजपर्यंत एकसारखा पापें करीत आलों आहें. मी दहाबारा वर्षांचा असतां शाळेंत जात होतों, परंतु मी अभ्यास करीत नाहीं

ह्मणून माझा पंतोजी वारंवार बाबांस सांगत असे. एके दिवशीं बाबा फार रागावून मला ह्मणाले, कुत्र्या तूं जर आजपासून मन लावून अभ्यास केला नाहींस तर माझी सर्व जिनगी वगैरे मी ह्या चिमकुल्यास देईन. हूंसें ते त्यावेळेस थट्टेनेंच ह्मणाले. परंतु अंतूनें भर दिल्यावरून मला तें खरेंसें वाटलें; आणि त्या बाळास ठार मारण्याचा निश्चय करून कोणी एक यशोदाबाई ह्मणून होती तिजकडून त्या बाळास मारून टाकविलें. अरेरे! काय पातक हें! त्या बाळाची आठवण झाली ह्मणजे माझ्या डोळ्यांपुढें त्याची सुंदर मूर्ति उभी राहते. आणि मी जर मृत्युलोकीं येऊं शकलों तर मला मारल्याबद्दल तुझ्या छातींत तरवार भोंसकली असती असेंच जणो काय ह्मणत माझ्याकडे डोळे वटारून पाहत आहे असें वाटतें. शिव! शिव! पुढें मी अंतोपंताच्या नादानें वाहियाली झालों आणि काहिंशूळ तृप्त करण्याकरितां सावकाराचीं कर्जे काढलीं, तीं अनेकवार बाबानीं फेडिलीं. कधीं कधीं मी घरचे दहा दहा वीस वीस रुपये याप्रमाणें किती तरी रुपये लांबविले असतील. शेवटीं चार पांच महिन्यामागें माझ्या दुर्वर्तणुकीबद्दल मला बाबानीं मारलें आणि तेव्हां मला फार राग आला, आणि मीं अंतूस पत्र लिहिलें. तेव्हां त्यानें भर दिल्यावरून खोटीं खतें करण्यास मी राजी झालों. आणि त्याचा काय भयंकर परिणाम झाला तो पहा! श्रीमंतांनीं बाबांस सुळीची आणि आईस जन्मठेपची सजा ठराविली. अरेरे! लहानपणीं बालहत्येचें पाप मीं आ-

पल्या डोक्यावर घेतलें आणि आतां पितृहत्येचें आणि मातृछलाचें पाप डोक्यावर घेणार. आतां बाबाची स्थिति कशी असेल? आई कोठें असेल? माझ्यामुळें त्यांना या यातना भोगाव्या लागत आहेत. शिव! शिव! माझ्या दुराचरणास पारावार नाहीं! हेच अनुतापाचे विचार अनेक वेळां माझ्या मनांत येऊन चुकले. मी पुष्कळदां अंतूची संगति सोडण्याचा निश्चय केला. परंतु काय करावें? तो माझ्याजवळ असला ह्मणजे माझें कांहीं चालेनासें होतें. माझा माझ्या शरीरावरील ताबा नाहींसा होतो. पण [आवेशानें] आजपासून मी निश्चय करितों कीं अंतोपंताची संगति सोडावयाची. अजून बाबांस जोंपर्यंत सुळीं दिलें नाहीं तोंपर्यंत खोटीं खतें मीं आणि अंतोपंतानें केलीं असें सांगून त्यांस सोडवितां येईल. परंतु—

**अंतोपंतः**—[दार उघडून आंत येतो] नमस्कार! नमस्कार!

**हरिपंतः**—नमस्कार!

**अंतोपंतः**—[हरिपंताकडे न्याहाळून पाहून] हरि, आज तुझी कांहीं आनंदी वृत्ति दिसत नाहीं

**हरिपंतः**—बाबांस उद्यां सुळीं देणार ह्मणून आनंद मानूं कीं काय?

**अंतोपंतः**—(मनांत) आजचा रंगच कांहीं निराळा दिसतो बोवा. (मोठ्यानें) आज पांच सहा महिने खटपट केलीस ती कशाकरितां तर? खोटीं खतें करण्याच्या भरीस तरी कां पडलास आणि मला तरी इतका त्रास कशाकरितां दिलास?

**हरिपंतः**—अनू तू रागावूं नको. मी तुला राग येण्याच्या उद्देशानें कांहीं बोललों नव्हतों. आपण दोघांनीं खोटीं खतें केलीं खरीं, पण माझ्या पापाबद्दल मला आतां पश्चात्ताप वाटूं लागला आहे. यासाठीं तूं जर माझा खरा मित्र असशील तर बाबांस आणि आईस सोडविण्याची कांहीं तरी तजवीज सांग.

**अंतोपंतः**--( मनांत ) ही स्वारी अशीच हातांत बांगड्या भरून बसणारी भागुबाई आहे हें मला कधीं-पासूनच ठाऊक होतें. तात्यासाहेब एकदां सुळीं जात तोंपर्यंत भीति आहे. मग मी हरिपंताला भीत नाहीं. पण तोंपर्यंत कांहींतरी तजवीज योजिली पाहिजे. ( मोठ्यानें ) हरि, तुझ्यासारखा मूर्ख आणि अजागळ मनुष्य मीं पाहिला नाहीं. तुला आपल्या आईबापांची कींव येते, परंतु त्यांनीं असें काय तुला फुलांप्रमाणें वा-गविलें ह्मणून कींव यावी ? लहानपणीं तात्यासाहेब तुला गुराप्रमाणें मारीत असत तें विसरलास वाटतें ? लिहितां, वाचतां, हिशेब ठेवितां आलें ह्मणजे बस्स आहे. उगीच खट्याळभर निरुपयोगी शास्त्रें शिकून करावयाचीं आहेत काय ? परंतु तात्यासाहेबांस पाणिनीचीं धड उच्चार करावयास देखील न येणारीं तीं सूत्रें महत्वाचीं वाटत असत आणि तीं तुला न आवडल्यामुळें तूं तीं पाठ केली नाहींस ह्मणजे तुला उलटा टांगून खालून वेताच्या लांब बारीक आणि सणसणीत छड्या मारीत असत तें विसरलास वाटतें ?

**हरिपंतः**—खरेंच अंतू, बाबांनीं तर मला फार क्रूर-

तेनें वागविलें आणि त्यांच्या मारण्याचा प्रकार मनांत आला ह्मणजे अंगावर कांटा उभा राहतो.

**अतोपत**:—हें तर जाऊंदे, पण दुसऱ्या अनेक प्रसंगीं त्यांनी तुला कसें छळलें तें विसरलास वाटतें? तूं दहा वर्षांचा होतास तेव्हां तुझा एक फटाकडा उडून गवताचे गंजीवर पडला आणि ती जळली तेव्हांपासून कधीं तरी त्यांनीं तुला दारू उडवूं दिली काय?

**हरिपत**:—खरेंच, अतोपत, मी फटाकडा कांहीं बुध्या गवताचे गंजीवर टाकला नव्हता. तो चुकून जाऊन तेथें पडला आणि त्यामुळें ती जळली. नुकसानही कांहीं फार झालें नाहीं, पण तेव्हांपासून दिवाळींत दारू ज्याचें नांव तो मला उडवायास मिळाली नाहीं. आणि मला तर दारूचा भारी नाद असे. शेजाऱ्यांचीं मुलें दारू उडवीत तेव्हां मी त्यांचे तोंडाकडे पाहत उभा राहीं.

**अतोपत**:—आपली जिंदगी तुला देणार नाहीं ह्मणून देखील त्यांनीं निश्चय केला होता. अरे, अशा गोष्टी थोड्या थोडक्या नाहींत, सदोदित घडत असत, त्या तूं विसरलास वाटतें?

**हरिपत**:—नाहीं! त्या सर्व आतां माझ्या डोळ्यांपुढें उभ्या आहेत.

**अंतोपंत**:—तर मग तुला आतां तात्यासाहेबांविषयीं काय ह्मणून कींव येते? जें कांहीं व्हायाचें असेल तें होऊं दे.

**हरिपंत**:—पण आई?

**अंतोपंत**:-ती बोलून चालून तुझी सावत्र आई. कधीं तिनें तुला मांडीवर घेतला, कीं कधीं खाऊ दिला, असें तिनें तुझें केलें तरी काय, ह्मणून तिची कींव तुला येते? तू वेडा तर नाहींसना?

**हरिपंत**:--अंतू! तूं ह्मणतोस तें अगदीं खरें आहे, आणि मघाशीं तुझ्याशीं मी तुटक रीतीनें बोललों त्याजबद्दल मजवर रागावूं नकोहो.

**अंतोपंत**:--[मनांत] असा ताळ्यावर ये. [मोठ्यानें] छेरे वेड्या, लहानपणापासून तूं आणि मी अगदीं जिवलग मित्र आहों, माझ्या मनांत तुझ्याविषयीं राग कधींही यावयाचा नाहीं समजलास?

**हरिपंत**:--बरें तू ज्या कामाकरितां गेला होतास तें काम कसें काय झालें!

**अंतोपंत**:--( आपणच पाठीवर शाबासकी घेऊन) अरे हा पठ्या गेल्यावर काम फत्ते व्हावयाचें नाहीं ह्मणजे काय गोष्ट आहे? बुधवारीं रात्रीं राममट आणि सगुणाबाई पळून गेलीं असें समजल्याबरोबर तू मला त्या दोघांस आणि निदान सगुणाबाईस तरी पकडण्या-विषयीं सांगितलेंस. मी तावडतोब येथून एका उमद्या घोड्यावर बसून पुण्यास गेलों. मला मोतिलालाचे घरीं तीं गेलीं असा संशय आलाच होता, ह्मणुन त्या घराच्या आसपास मी घिरट्या घालूं लागलों. इतक्यांत राममट त्या घराचे मागचे बाजूस दृष्टीस पडला.

**खिजमतगार**:-( येऊन )मेणा तयार आहे खालीं.

हरिपंतः—अंतू, तू यात्रयाचे आधीं मला चैन पडत नव्हतें ह्मणून मी लवंगी बागेंत जावयाचा बेत करून मेणा काढावयास सांगितलें होतें, तर आतां आपण मेण्यांत बसून बागेंतच जाऊं आणि वाटेनें मला सारी हकीकत सांग.

अंतोपंतः—ठीक आहे. बरें पण, माझें बक्षीस?

हरिपंतः—अरे बक्षिसास काय उशीर; हे घे पांचशें रुपये. [फडताळाकडे जावयास निघतो].

अंतोपंतः—पण हरिपंत, कामगिरी चोख बजाविल्याबद्दल कांहीं जास्ती बक्षीस तुम्हीं मला दिलें पाहिजे.

हरिपंतः—बरें हे घे सहाशें रुपये. कबुलायतीपेक्षां शंभर जास्ती. (रुपये देतो).

हरिपंतः—(पोशाख करतो) चल आतां (जातात).

( पडदा पडतो. )

पहिला अंक समाप्त.

# अंक २ रा.

## प्रवेश पहिला.

स्थळ—सातारा.

**हरिपंत**:–[ पलंगावर पडला आहे ] उद्यां गांवा- बाहेर माळावर एक सूळ उभारतील. एक मांग येऊन बाबांचे हात पाठीमागें बांधील. दुसरा एक मांग बा- बांच्या तोंडावर काळी टोपी घालील. मग ढोलकीं वाजत असतां चार पांच मांग मिळून बाबांस सुळा- वर [ शहारे देऊन ] चढविलील. आणि मग बाबा या जगांतून नाहींसे होतील आणि मग तर मला अखंड सुखप्राप्ति होईलना ?

**पिशाच्यांच्या पांढऱ्या आकृति**:–[येऊन] नाहीं! नाहीं!! नाहीं!!! कधीं नाहीं तुला सुखप्राप्ति व्हावयाची.

(हरिपंत दचकतो आणि त्याच्यानें बोलवेनासें होतें).

**सर्वांत उंच आकृति**:–(सावकाश) तूं मला हाल हाल करून मारीत आहेस. परंतु ईश्वर माझा संरक्षक आहे. तो सद्गुणी मनुष्यास कधीं अंतर देत नाहीं. मी कसाही या संकटांतून सुटेन, परंतु मला छळल्या- बद्दल मरणसमयीं तुझें अंतःकरण पश्चात्तापानें होरपळून तूं मरशील. ( हसते )

**धाकटी आकृति**:—तूं मला संकटांत टाकिलें आहेस, परंतु दीनवत्सल परमेश्वर मला साहाय्य आहे. तो निरपराध्यांस कधीं अंतर देत नाहीं. परंतु—

**दोन्ही आकृति**:—तूं आमचें दोन वर्षांचें मूल यशोदाबाईकडून मुठी मुरगळून मारून टाकविलेस, आणि आमच्या दांपत्यप्रीतीचा अंकुर मुळापासून खुडून टाकलास, ह्मणून तुझ्या पातकाबद्दल तुझें दांपत्य-प्रीतीचें बींच रुजूं देणार नाहीं. मग अंकुर कोठून? आणि अंकुर नाहीं तर वृक्ष कोठून तुझ्या दृष्टीस पडणार ? [ दोन्ही आकृति हंसतात ].

**धाकटी आकृति**:—( सावकाश ) तूं आपल्या सुंदर स्त्रीला घेऊन

**मोठी आ**०:—( सावकाश ) पुष्पशय्येवर बसशील.

**धा० आ**०:—तिच्या मुखचंद्रम्याकडे पाहून

**मो० आ**०:—आनंदसागरांत बुडून जाशील.

**धा० आ**०:—आणि मग तिच्या अधरपल्लवाचें

**मो० आ**०:—आपल्या कृतार्थ ओष्ठांनीं चुंबन घेशील आणि तुझ्या हृदयांत आनंदाच्या लाटा उचंबळूं लागतील.

**धा० आ**०:—परंतु जेव्हां त्या सौंदर्यलतिकेच्या शरीराचें

**मो० आ**०:—आलिंगन घ्यावयास जाशील,

**सर्वांत धाकटी आकृति**:—तेव्हां मी तुझ्या-पुढें उभा राहीन आणि तुला आलिंगन घेऊं देणार नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या तान्हेल्या मनुष्यानें आपल्या ओष्ठांपुढें अमृताचा पेला धरलेला असावा आणि कोणी तरी अकस्मात तो लवंडून द्यावा, त्या-प्रमाणें तूं नंदनवनोपमसुखास तयार झाला असतां तुला त्या सुखाचा आस्वाद मी घेऊं देणार नाहीं. मी

दोन वर्षांचा लहान असतां यशोदाबाईकडून माझी मुंडी तूं मुरगळविलीस त्याचे हे पहा करकोचे मानेवर कसे रुतले आहेत ( मान पुढें करून दाखविते ).

**तिन्ही आकृति:**-तुझें वाईट पाहून आह्मांस फार आनंद होईल.

( मोठ्यानें हांसतात आणि सावकाश दारांतून जातात )

**हरिपंत:**-( किंकाळी फोडून पलगावरून उडतो आणि कांहीं वेळ स्तब्ध राहून इकडे तिकडे पाहून ) मला कांहीं स्वप्न तर नव्हतना पडलें? (विचार करून) छेः स्वप्न कोठलें? स्वप्न नव्हतें यांत बिलकुल शंका नाहीं. मीं ( डोळ्यांकडे बोट करून ) या डोळ्यांनीं ( शहारे देऊन ) त्या तिन्हीं आकृति पाहिल्या. शिव शिव! माझ्या अंतःकरणाला स्वस्थता ह्मणून कधीं मिळावयाचीच नाहीं कीं काय?( मोठ्यानें ) अरे विठ्या, ए विठ्या, अरे विठ्या एऽ! विठ्या असेल गाढ झोंपेत ( आणखी मोठ्यानें ) अरे ए विठ्या—आ—आ विठ्या.

**विठ्या**--( बाहेरून ) जी—ई--ई.

**हरिपंत**--असा इकडे ये. ( विठ्या पुढें जातो. )

**ह० पं०:**—घड्याळजीस जाऊन विचार बरें किती वाजले ते.

**विठ्या:**—( जाऊन येतो ) मध्यरात्र उलटून एक घटका झाली.

**ह० पं०:**—(मनांत) तर मग रात्र कांहीं फार उरली नाहीं. आतां आपण उजाडेपर्यंत ह्या तसबिरा पाहून

वेळ घालवावा. (मोठ्यानें) विठ्या बाहेर बसून रहा. उजाडेपर्यंत निजूं नकोहो.

**विठ्या**:-नाहीं सरकार. जागाच रहातों. (जातो.)

---

### प्रवेश २.

**स्थळ**—सातारा, अंतोपंताची खोली.

**अं० पं०**:-मीं आजपर्यंत हरिपंतापासून किती तरी रुपये उपटले. थोडक्यांत थोडके म्हटले तरी हजार सहज होतील. हरिपंत अगदीं भोळसर मनुष्य आहे. त्याला कांहीं सांगितलें तरी तो ऐकतो. त्याचें मन वळविण्यास मुळींच श्रम पडत नाहीत. वारंवार तात्यासाहेबांविषयीं हरिपंताचें मनांत वाईट वाईट गोष्टी बिंबवून देऊन शेवटीं या थराला गोष्ट आणिली. आज दुपारीं तात्यासाहेबांस सुळीं दिलें म्हणजे झालें. मग माझ्या चित्ताला बिलकुल घोर रहाणार नाहीं; तोंपर्यंत हरिपंताशीं सलोख्यानें वागलें म्हणजे झालें. मग पन्नास हजारांची जिंदगी हरिपंतापासून मला कबुलायतीप्रमाणें मिळेल. आणि मग पांच सहा महिन्यांच्याआंत हरिपंतापासून जें कांहीं असेल नसेल तेवढें फसवून काढून घेईन. मग उत्तर हिंदुस्थानांत कोठें तरी जाऊन चैन करीत राहीन. मी एका सुंदर स्त्रीशीं लग्न लावीन; चाकर वगैरे खूप ठेवीन. गाण्याबजावण्यामध्यें अगदीं गर्क होऊन जाईन. मग माझ्यासारखा सुखी प्राणी दुनियेंत मिळणार नाहीं.

**रामज्या**:-(येऊन) रावसाब, हरिपंत आपणास भेटाया आल्याति.

**अं० प०**:-येऊं दे त्यांना वरती.

**रामज्या**:-जी साब. (जातो).

**अं० प्र०**:-नमस्कार. यावें तुह्मी हरिपंत. आज इतक्या सकाळींचसे बाहेर पडलांत ?

**हरिपंत**:-तसेंच कांहीं आहे, म्हणून तुझ्याकडे आलों. तुला काय सांगूं, काल मला असा भयंकर देखावा दृष्टीस पडला कीं तसा मीं अजूनपर्यंत पाहिला नव्हता. आणि तूंही पाहिला नसशील.

**अं० प०**:-(मनांत) बावळट म्हणावें तें याच्यासारख्या लोकांना ! (मोठ्यानें) काय देखावा पाहिलास सांग तर खरा.

**हरिपंत**:-काल कीनाहीं मी रात्रीं निजण्याकरितां म्हणून बिछान्यावर पडलों होतों. मला झोंप कांहीं लागली नव्हती. मध्यरात्र झाली होती आणि दिवा अंधक अधक जळत होता. अशावेळीं अकस्मात माझ्या दिवाणखान्यानें दार वाजलें. आणि मी तिकडे पाहतों तों तीन आकृति पांढऱ्या शुभ्र वस्त्रांनीं आच्छादलेल्या माझ्या दृष्टीस पडल्या. त्यांपैकीं एक सर्वांत उंच होती. दुसरी तिच्याहून जराशी ठेंगणी होती. आणि तिसरी अगदीं लहान होती. त्या मनुष्यांच्या आकृति असाव्यात असें मीं तेव्हांच ताडलें. परंतु कांहीं वेळ त्यांच्याकडे टक लावून पहात राहिलों तों उंच आकृति तात्यासाहेबाच्या सारखी दिसली. मधली माझ्या आईप्रमाणें दिसली, आणि तिसरी माझा

सावत्रभाऊ सदाशिव, ज्याची मुंडी मी यशोदाबाईकडून (शहारे देऊन) मुरगळली, त्याची होती. त्या प्रसंगीं जें जें घडलें तें मी आतां तुला सारें सांगत बसत नाहीं. पण दोन मोठ्या आकृती मला म्हणाल्या 'ईश्वर आमचा संरक्षक आहे. तो आम्हास कधींही अंतर देणार नाहीं. आह्मी कसेही या संकटांतून मुक्त होऊं. परंतु तुझ्या अपराधाबद्दल तूं पश्चात्तापानें होरपळून मरशील.' धाकटी आकृति ह्मणाली "तूं माझ्या आईबापांच्या दांपत्यप्रेमाचा अंकुर खुडून टाकलास ह्मणून मी तुला पत्नीसुख भोगूं देणार नाहीं." मी तुला त्याची सारी हकीकत सांगितली नाहीं. पण माझ्या अंतःकरणावर ती जशी कांहीं लाल तापलेल्या लोखंडाच्या खिळ्यानें खोदून ठेविली आहेसें वाटतें. अतिशय भयंकर देखावा बोवा! मला वाटतें हा कांहीं तरी दाखला असावा! आतां पुढें काय करावें,

अं० प०:—अरे छे.! दाखला कसचा! तूं सदोदित त्याच गोष्टीविषयीं विचार करीत असतोस ह्मणून तुझ्या मनाला कांहीं तरी भ्रांति होते इतकेंच, दुसरें कांहीं नाहीं. रामदासाचे चार पांच अभंग तुला माहीत असतीलच.

छाया देखोनी आपुली । शंका अंतरीं वाटली ॥
ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥
मुखें बोलतां उत्तर । तेथें झालें प्रत्युत्तर ॥
डोळा घालितां अंगुळी । एकाचीं तीं दोन झालीं ॥
पोटीं आपण कल्पिलें । तेंचि आलेंसें वाटलें ॥
दास ह्मणे हे उपाधि । शंका धरितां अधिक बाधी ॥

समजलास?

**हरिपंत**:–मला आतां वाटतें कीं मीं जें पाहिलेंसें मला वाटतें तें केवळ माझ्या बुद्धीचेच कुतर्क असावेत. (मनांत) पण त्या चमत्काराचा कांहीं तरी दाखला असेल असें माझें मन मला सांगत.

**अं० पं०**:–तूं रात्री एकटा निजतोस म्हणून असे भयंकर देखावे तुला दिसतात. तूं लग्न केलेंस म्हणजे तुझें मन असल्या पोरकट गोष्टींपासून वळेल हें मी खात्रीनें सांगतों. यासाठीं—अरे, पण तुला कांहीं गलबला ऐकूं येत नाहीं काय?

**हरिपंत**:–होय–मोठाच गलबला ऐकूं येतो.

**अं० पं०**:– (खिडकींतून डोकें बाहेर काढून) हींतून कांहीं दिसत नाहीं. मी रामज्यास पाठवून शोध आणवितों. रामज्या-आ, ए रामज्या-आ!

**रामज्या**:–(येऊन) जी महाराज.

**अं० पं०**:–अरे रस्त्यांत हा कसला गलबला होत आहे, पाहून ये बरें.

**रामज्या**:–जी सरकार. (जातो).

**रामज्या**:–(येऊन) तात्यासाब कोलटकर काल रात्रीं तुरंगामधून पळून गेले म्हून समद्या लोकांमंदीं बातमी पसरली हाय. त्येंचा रकवालदार आज चार वाजतां त्यांसनी नाट वाढून रोटी घेऊन गेला आन् पाव्हतो तो तात्यासाब तिते नव्हत. त्ये कोटून पळाले अ-सात्र म्हून इकड तिकड पातो तो योका खिडकीच्या दोन भले भक्कम लोकंडी गराद्या फांकटल्या हायती असं पघितलंन्, त्ये त्या खिडकीमंदून भाईर पडल्या-

वर पुढे कसे निसटून गेले त्ये बरीक न्हाय समजत. कारन त्येच्या पुड येक मोठी भिंत हाय आणि तिच्या भवतीं समदायेल सिपायांचा पहारा असतुया.

अं० पं०:—असें काय! बरें, तूं जा आतां.

[ विचार करीत राहतो. ]

हरि०:—( मनांत ) मला काल जो चमत्कार दिसला त्याचा प्रत्यय हा आला. माझें अंतःकरण कांहीं विलक्षण आहे. बाबा कैदेंत होते तोंपर्यंत त्यांनीं सुळीं जाऊं नये आणि सुटून जावें असें वाटत होतें. परंतु आतां ते पळून गेले अशी बातमी ऐकून देखील चित्ताला समाधान वाटत नाहीं. शिव शिव! मला आणखीं किती यातना काढावयाच्या आहेत कोण जाणे. मृत्यू येईल तर फार बरें होईल. ( मोठ्यानें ) अंतू, आतां माझें अंतःकरण स्वस्थ नाहीं. मी जातों. तूं दुपारीं ये माझ्या घरीं. ( जातो. )

अं० पं०:—( आपल्याशींच ) अनु तुला कांहीं भिण्याचें कारण नाहीं. जोंपर्यंत तुझी बुद्धि अशीच कायम आहे, तोंपर्यंत सर्व कांहीं गोष्टी तुला अनुकूलच होतील.

---

## प्रवेश २.

स्थल.—नारोबा पुणे कोतवालाचे घरांतील सगुणाबाईची खोली.

स० बा०:—काल मला विषाची कल्पना सुचली म्हणून बरें झालें. पण आज कांहीं ती युक्ति लढवितां येणार

नाहीं. असें समजून तीन दिवस मला विचार कर-ण्यास सवड दे म्हणून मुदत मागून घेतली तर या तीन दिवसांत बाहेर पडण्याची कांहीं तरी तजवीज पाहिली पाहिजे. (विचार करीत बसते) हां हां, असेंच केलें पाहिजे, त्याशिवाय परिणाम नाहीं. (इतक्यांत खंड्या ताट घेऊन येतो.)

**खंड्याः**–बाई हें तुमचें फराळाचें ताट.

**स० बा०ः**–[त्याच्या डोळ्यांत धूळ घालते. तो डोळे चोळूं लागतो. तों ती त्याचे हात बांधते, मग त्याच्या तोंडांत फडक्याचा बोळा कोंबते आणि त्याचा अंगर-खा फाडून काढते आणि रुमाल काढून आपण घाल-त्ये ] येथपर्यंत तर युक्ति सिद्धीस गेली. आतां धिटा-ईनें घराच्या बाहेर पडलें पाहिजे. (चालते. दाराच्या-बाहेर जाऊन कडी लावते व मग घराच्याबाहेर पडते.) मी घराच्याबाहेर तर सुरक्षितपणें येऊन पोंचलें. आतां कोंडे जावें बरें? (रामभटास पाहून)–कोण, रामभट?

**रामभटः**–(पाहून) कोण, वहिनीबाई?

**स० बा०ः**–होय मीच.

**रामभटः**–(हळू स्वरानें) आतां कांहीं न बोलतां चला. पुण्याचे शेजारीं वडगांव म्हणून एक खेडें आहे तेथें जाऊं. तेथें एक माझ्या ओळखीची बाई आहे. तेथें गेल्यावर पुढचा विचार करूं. (असें म्हणून दोघे वडगांवची वाट धरतात.)

**रा० भ०ः**–वहिनीबाई, तुम्ही थकलांतसें वाटतें.

स० बा०:-होय. मी फार थकून गेलें आहे. कोठें तरी आतां घटकाभर बसून विसावा घेऊं.

रा० भ०:-हें चौसोपी देऊळ आहे. आपण आंत जाऊन बसू या. (आंत जातात) हे या येथें दोन वैरागी निजले असावेतसें वाटतें. कारण येथें ही एक आगटी आहे पहा. चला आपण देवीजवळच्या सोप्यात जाऊन बसू. (जाऊन बसतात)

स० बा०:-रामभट मला आधीं हें सांगा कीं मी नारोबाच्या घरांतून बाहेर पडायास आणि तुह्मी येथें यावयास एक गांठ कशी पडली. तुह्मी साताऱ्यासना गेला होतां?

रा० भ०:-कोठला सातारा आणि कोठलें काय? मी तुह्मास मोतीलालाचे घरांत ठेऊन घराच्या बाहेर जों पडतों तों मला अंतोपंत भेटला, आणि मग आह्मीं एकमेकांच्या सोबतीनें साताऱ्याकडे ह्मणून जाऊं लागलों. जातांजातां एका राईत शिरलों, तेव्हां त्यानें शीळ घातली, त्याबरोबर त्याचे दोन साथी झाडींतून पुढें आले, आणि मग ते तिघे मला बांधू लागले. परंतु मी मोठ्या शर्तीनें त्यांच्या तावडींतून सुटलों, आणि त्याच झाडींतल्या एका झाडावर लपलों. पुढें त्यांनीं माझा पुष्कळ शोध केला, पण मी सांपडलों नाहीं, ह्मणून ते जाऊं लागले. जातांना ते हळू कांहींबेळ बोलले यामुळें ते कोठें निघाले हें मला कळेना. मग ते गेल्यावर मी खालीं उतरलों आणि पुन्हां मोतीलालाचे घरीं जावें असा विचार केला. कारण मला संशय आला होता कीं मला अंतोपतांनें मोतीलालाचे घराशीं पाहिलें. त्यावरून त्याला क-

दाचित शंका आली असेल कीं सगुणाबाई येथेंच असतील, ह्मणून तो तिकडेच गेला असावा, असा तर्क करून मग मी मोतीलालाचे घराकडे निघालों आणि तेथें जाऊन पोंचल्यावर मी त्याला घेऊन तुमच्या तळघराकडे आलों, आणि पाहतों तों तुह्मी तेथें नव्हतां. पलंगावरील गादी वर केली होती; गादीखालीं जवाहीर वगैरे नव्हतें. त्यावरून आह्मीं तेव्हांच ताडिलें कीं अंतोपंतानें येथें येऊन तुह्मांस नेलें असावें. मग बाहेर येऊन दिवा घेऊन पाहतों, तों पुष्कळ पावलें उलटीं सुलटीं मातीवर उमटलेलीं होतीं आणि तीं गवताच्या गंजी-पर्यंत होतीं. आणि शेजारच्या भींतीच्याही विटा कांहीं ढासळल्या होत्या. यावरून उघड झालें कीं त्या चोरांनीं तुह्मांस याच मार्गानें बाहेर काढिलें असावें. मग आतां तुमचा शोध कोठें करावा ह्मणून आह्मी विचार करूं लागलों तेव्हां मोतीलालानें ह्मटलें कीं शहरच्या कोतवालाचे स्वाधीन बहुतकरून त्यांनीं तुह्मांस केल्या असाव्यात. ह्मणून मी तारेचा कोतवालाचे घराकडे गेलों तेथें जाऊन पाहतों तों अंतोपंत आणि दुसरे दोघे—जे मला बांधायाकरिता झाडींत आले होते—इतके असामी घराच्या बाहेर येतांना दृष्टीस पडले. तेव्हां तुह्मीं येथेंच असाव्यात असा जो मला संशय आला होता तो दृढ झाला. मग एक दोन दिवस मीं कोतवालाच्या घराशेजारीं निरनिराळ्या वेषानें फिरत होतों, आणि कोणत्या रीतीनें तुह्मांस येथून सोडवून नेतां येईल याचा विचार करीत होतों. कोतवाल अगदीं मांगांतला मांग आहे. तो तुह्मांला कांहीं तरी

अपाय करील या भीतीनें मला वाटत होतें कीं तुह्मीं त्या सिंहाच्या गुहेंतून जितक्या लवकर बाहेर पडाल तितक्या चांगल्या. आज मीं रोजच्या प्रमाणें बाहेर हिंडत असतां तुह्मांस ओळखलें अशी माझी हकीकत आहे. पण आपलाच बचाव होऊन कांहीं उपयोग नाहीं. तिकडे तात्यासाहेबांची स्थिति काय असेल कोण जाणें.

**स० बा०**:–माझें चित्त रात्रंदिवस तिकडेसच लागलेलें असतें. (देवीस) आई, तूं आह्मांस जसें संकटांतून पार पाडिलेंस तसेंच प्राणनाथासही संकटांतून पार पाड. एवढीच माझी तुला दोन हात जोडून प्रार्थना आहे. मला संतति नको, दासी नकोत, कांहीं नको, माझ्या पतीची आणि माझी गांठ घालून दे.

**तात्यासाहेब**:–(देवीचे मागून उठून) प्राणप्रिये!

**स० बा०**:–प्राणनाथ, (आलिंगितात.)

**नारोबा कोतवाल**:–(येऊन) सगुणाबाईचा येथपर्यंत तर पत्ता काढला. आतां पुढचा मात्र लागत नाहीं. ती या देवळांत तर नसेलना गेली? (पुढें होऊन सगुणाबाइस पाहून) रांडे, तूं खड्याची तशी अवस्था करून पळून आलीस, नाहीं! अरे, येथें तात्यासाहेब देखील सुळीची शिक्षा चुकवून आला आहे. तात्यासाहेबांस धरून देण्याबद्दल ठेविलेलें पांचहजारांचें देखील बक्षीस मीच मिळवीन. (शिपायांस) बांधारे याच्या मुसक्या. (शिपाई येतात. रामभट आणि तात्यासाहेब त्यांच्या तरवारी हिसका-

वून घेतात. आणि तीन शिपायांस वार करितात. नारोबा कोतवाल तात्यासाहेबांच्या दंडावर वार करितो. तात्यासाहेब खालीं पडतात. इतक्यांत रामभट नारोबास एक मोठी जखम करितो नारोबा खालीं पडतो )

**स० बा:**-शिव! शिव !! आमचें दुर्दैव जसें कांहीं हात धुवून आमच्या पाठीस लागलें आहे. आमची गांठ पडली कीं नाहीं तोंच ही जखम लागली. हाय, हाय!

**रा० भ०:**-वहिनीबाई, अशा घाबरू नका आपण हर प्रयत्न करून जखमेंतील रक्त बंद करूं आणि जखम बरी होण्याची कांहीं तरी तजवीज करूं. ( इतक्यांत एक वैरागी जवळ येतो. )

**वैरागी:**--( जखमा पाहून रामभटास ) तुह्मी भिऊ नका. माझ्याजवळ एक मुळी आहे. ती जखमेस लावून दिल्यावर एका घटकेमध्यें जखमेंतून रक्त वाहावयाचें बंद होतें. आणि तीन दिवसांत जखम बरी होते. मी मुळी आणावयास जातों. ( जाऊन येतो ) पहा आतां ( मुळी जखमेस लावतो. रक्त बंद होतें व तात्यासाहेब शुद्धीवर येतात. )

**तात्यासाहेब:**-रामभट, हे कोण? नारोबा कोतवाल आणि त्याचे शिपाई?

**रामभट:**-होय.

**तात्यासाहेब:**-हे वैरागी कोण?

**रामभट:**-त्यांनीं तुमची जखम बरी करून तुह्मांस जीवदान दिलें.

**वैरागी:**-मी तुमचा मित्र आहे. माझें नांव विल्बक

नाथ. मी यात्रेस जात आहें. आपण सगळे कोण हें मला सांगाल तर मजवर मोठी कृपा होईल.

तात्या०:-वैराग्रीबुवा तुह्मी माझी जखम बरी केलीत यामुळें तुह्मी मला मित्राचे ठिकाणीं आहां. तर कांहीं लपविण्याची गरज नाहीं असें समजून मी आपली सर्व हकीकत तुह्मास सांगतों. मी सातान्यास रहात असतों. पुढें कांहीं लबाड लोकांनीं—माझा मुलगा आणि अंतोपंत ह्मणून त्याचा एक मित्र आहे त्या दोघांनीं—खोटीं खतें केलीं.

राम०:-आपणास कों कळलें कीं हरिपंत आणि अंतोपंत यांनीं खोटीं खतें केलीं ह्मणून?

ता० सा०:-ज्या दिवशीं सरकारचे शिपाई आपल्या वाड्यांत आले त्याचे आदले दिवशीं ह्मणजे मंगळवारीं हुजुरास हरिपंत आणि अंतोपंत यांनीं खाजगी रीतीनें कळविलें कीं तात्यासाहेब हे खोटीं खतें करीत असतात. आणि हल्लीं देखील द्वारकानाथाचे विरुद्ध एक खोटा रोखा केला आहे. पाहिजे तर श्रीमंतांनीं घराचा झाडा घ्यावा. त्यावरूनच बुधवारीं घराचा झाडा घ्यावयास लोक आले.

राम०:-यावरून उघडच आहे कीं हरिपंत आणि अंतोपंत यांनीं खोटीं खतें केलींच असावींत आणि माझा देखील वहीम त्या दोघांवरच होता. बरें पुढें—

तात्या०:-पुढें मला धरून नेल्यावर दुसऱ्या दिवशीं चौकशी सुरू झाली. परंतु अंतोपंतानें न्यायाधीशाची आधींच चांगली तुंबडी भरली असावी, ह्मणूनच मीं खोटे रोखे केले नाहींत अशा पुष्कळ वेळां

शपथा वाहिल्या तरी त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं मला सुळीं द्यावें म्हणून फैसला झाला. आदितवारीं ती भयंकर शिक्षा अमलांत आणणार, तों शनवारीं रात्रीं मीं तुरुंगांतून बाहेर पडलों. मग वेष पालटून आडमार्गानें लपत छपत येथपर्यंत येऊन पोंचलों. पुढें काय झालें हें तुम्हां सर्वांना माहित आहेच. बैरागीबुवा पुन्हा मीं तुमचे उपकार मानितों. तुमच्या हांतून नेहमीं अशींच परोपकाराचीं कृत्यें घडोत.

**बिल्वकनाथः**—मीं यांत कांहीं मोठें केलें नाहीं. बरें तुम्ही आतां असें करा कीं येथून लवकर पळून जा नाहीं तर पुन्हां एखाद्या संकटांत पडाल.

**रा० भ०**:—हे म्हणतात तें खरें आहे. आपण नारोबा कोतवाल आणि त्याचे तीन शिपाई यांचे घोड्यावर बसून पळून जाऊं.

**ता० सा०**:—तुम्ही म्हणतां तें ठीक आहे. बैरागीबाबा जातों आम्ही. पण आमची ओळख रहाण्याकरितां ही घ्या माझी आंगठी तुम्हांस बक्षीस.

**बैरागी०**—(घेतो) बरें जा आतां तुम्ही सारे.

**सारे०**—बैरागीबुवा, देव तुमच्या हांतून अशींच परोपकाराचीं कृत्यें घडवो.

(तिघेजण तीन घोड्यावर बसून जातात.
त्यांचे मागुन कोतवाल जातो.)

अंक दुसरा समाप्त.

# अंक ३ रा.

## प्रवेश १.

स्थळ—सातारा—हरिपंताचे घराशेजारची बाजू.

**बिल्वकनाथः**—आज संध्याकाळीं मीं दोघां मनुष्यांस पाहिलें, त्यांपैकीं एकाचा चेहेरा हुबेहुब तात्यासाहेब—जे मला पुण्याचे शेजारीं भेटले व ज्यांची जखम आपल्या मुळींनें मीं बरी केली; त्यांच्या तोंडवळ्याप्रमाणें होता, तर हा कदाचित् त्यांचाच मुलगा असेल, आणि असला तर यानेंच खोटीं खतें करून आपल्या बापास संकटांत घातलें असेल; व ज्याच्या खांद्यावर त्यानें हात टाकिला होता, तो याच्या दुष्कर्मांमध्यें मदत करणारा असावा. ते दोघेजण या घरांत शिरले. काय असेल तें असो! तात्यासाहेबांस मीं प्रथम जेव्हां पाहिलें, तेव्हांपासून त्यांचेविषयीं माझे मनांत कांहीं विलक्षण प्रेम उत्पन्न झालें आहे, आणि त्यांना आपल्या संकटांतून हरप्रयत्नानें मुक्त करावेंसें वाटतें. आपण या घरांत शिरून रात्रीची जागा मागावी आणि सकाळपर्यंत कांहीं तरी तजवीज शोधून काढावी. (घरांत जातो) शिपायीबोवा, आह्मी पांथस्थ वैरागी आहोंत. एक रात्रभर येथें कोठें कोपऱ्यांत आह्मांला जागा द्याल तर ईश्वरापाशीं आह्मी तुमचें हित चिंतू. शिपायीबावा, नाहीं ह्मणूं नका; आह्मी [illegible] आलों आहोंत.

**शिपायीः**—आमची कांहीं हरकत नाहीं, बसा या इकडे. (दोघे वैरागी बसतात.)

**शिपायी**:—कोणीकडे यात्रेस निघलांत तुह्मी ?

**बिल्वकनाथ**:—आह्मी रामेश्वराकडे चाललों आहों.

**शिपायी**:—बैरागीबोवा, रामेश्वरास माझ्या नांवाचा एक पैसा आठवणीनें द्या बरें.

**बैरागी**:—हो, हो, अलबत देऊं बरें.

**शिपायी**:—तुह्मी देवडीवर त्या पलीकडच्या कोपऱ्यांत निजा स्वस्थ.

---

## प्रवेश २.

### स्थळ—हरिपंताची खोली.

**हरिपंत**:—अलीकडे अतोपंताचा माझ्याशीं बोलण्याचालण्याचा प्रकार पुष्कळ बदलला यांत कांहीं शंका नाहीं; आणि काल तर फारच फरक दिसून आला. काल कांहीं मला त्या वेळेस फारसा भेद दृष्टीस पडला नाहीं, परंतु आज जों जों त्याच्या बोलण्याचालण्याच्या प्रकाराचा विचार मी करितों, तों तों तर तो अधिकच दृष्टीस पडतो. इतके दिवस तो माझ्याशीं सलगीनें वागत असे, परंतु अलीकडे तो माझ्याशीं शिरजोरपणानें वागत असतो. त्याचा सर्व डामडौल माझ्या पैशावर चालतो हें आतां तो विसरलासें दिसतें. काल तर त्यानें आपले बोलण्यांत असें दर्शविलें कीं इतके दिवस त्यानें जी खटपट केली ती माझ्याकरितां नव्हे तर त्यानें आपल्या स्वतांच्याकरितां केली. अत्या असा कां बरें माझ्याशीं वागु लागला ? तो माझ्याशीं असा कां वागूं लागला हें आतां उघड आहे. जोंपर्यंत त्याला माझी गरज होती, तोंपर्यंत तो मित्रभावानें वागत असे.

परंतु आतां माझ्यामुळें त्यास पुष्कळ ऐवज मिळाला, तेव्हां माझी त्याला आतां गरज उरली नाहीं ह्मणून माझ्याशीं तुटक रीतीनें वागूं लागला आहे. शिव, शिव! मी किती भोळा! त्यानें अव्वलपासून अखेरपर्यंत मला ठकाविलें. मी पुष्कळ वेळां त्याच्याशीं तुटकपणानें वागण्याचा निश्चय केला, पण काय करावें? माझ्यानें तसें वागवत नाहीं. शिव! शिव! बाबा आणि भाई यांची काय स्थिति असेल? ते आतां कोठें असतील? एकदां वाटतें कीं बाबा तुरुगांतून पळून गेले हें बरें झालें. एकदां वाटतें कीं श्रीमंतांजवळ जाऊन आपण आपला सर्व अपराध कबूल करावा. परंतु असें केलें तरी देखील तें चांगलें नाहीं, कारण तेणेंकरून लोकांस माझा अपराध कळून माझी छीः थूः होईल.

बिल्वकनाथः–[येऊन उभा रहातो.]

हरिपंतः–तूं कोण आहेस आणि येथें कशाकरितां आला आहेस?

बिल्वकनाथः–मी यात्रेकरू रामेश्वरास जाण्याकरितां उत्तर हिंदुस्थानांतून आलों आहें. येतांना पुण्याचे शेजारीं मला कांहीं मंडळी भेटली, त्यांमध्यें एक पन्नास वर्षांचे वयाचे गृहस्थ होते. त्यांना एक जखम लागली होती ती मीं आपल्याजवळ असलेल्या एका मुळीनें बरी केली; आणि मग त्यांना त्यांची हकीगत विचारिली. ते ह्मणाले, "मी साताराचा राहणार, मी तेथें सुखानें वीस पंचवीस वर्षें काढिलीं. पुढें माझ्या मुलानें एका वाईट मनुष्याच्या संगतीस लागून खोटीं खतें केलीं."

**हरीपंतः**–[ मनांत ] मीं खोटीं खतें केलीं हें बाबास कसें बरें कळलें ?

**बिल्वकनाथः**–" श्रीमंतांनीं फारशी चौकशी न करितां मला सुळीची सजा फर्माविली आणि मला आदित्यवारीं सुळीं देणार तों शनिवारीं रात्रीं तुरुंगांतून पळून आलों." मग पुढें ते आपल्या वाटेनें गेले. मीही यात्रेच्या संबधानें सातार्‍यास आलों आणि पाहातों तों तुमचा तोंडवळा त्यांच्याशीं पुष्कळ मिळतो, असा वाटला. तेव्हां मीं तर्क केला कीं आपल्या बापास संकटांत घालणारे चिरंजीव हेच असावे. आणि मग त्यांना दोषमुक्त करून त्यांची सुटका करण्याच्या उद्देशानें या घरांत येऊन शिपायांस विचारून एक रात्र वसति केली. मी निजलों असतां माझ्या शेजारीं खोलींत कोणी बोलत आहे असें वाटल्यावरून लक्ष देऊन ऐकूं लागलों तों तुह्मी आणि तुमचे मित्र–ज्यांचें नांव अंतोपंत आहे असें मला पुढें कळलें. ते असे–खोट्या खतांविषयीं बोलत होतां, असें मला आढळून आलें. तुह्मीं खोटीं खतें कशीं केलीं, त्यासंबधीं तुमचा दोघांचा पत्रव्यवहार कसा काय चालला होता, इत्यादि सर्व गोष्टी मीं ऐकिल्या. आतां माझ्यापुढें नाहीं होय ह्मणून तुमचा नीट परिणाम लागणार नाहीं. तर मुकाट्यानें तो पत्रव्यवहार मला दाखवा; ह्मणजे श्रीमंतांपुढें मी आपली साक्षी देऊन जी शिक्षा तुमचे वडील हल्लीं भोगीत आहेत ती तुह्मास भोगावयास लावीन.

**हरिपंतः**–पण–

**बिल्वकनाथः**–पण नाहीं नी कांहीं नाहीं. मी तुझ्याला पुन्हां एकवार सांगतों कीं अंतोपंताशीं काल-चें तुमचें भाषण मीं ऐकिलें. आतां माझ्यापुढें कांहीं लटपट चालावयाची नाहीं. चल, दाखीव, मला तो पत्रव्यवहार.

**हरिपंतः**–पण वैरागीमहाराज, जर माझा अपराध लोकांस कळला तर लोकांत माझी छिः थूः होईल.

**बिल्वकनाथः**–दुष्टा, खोटीं खतें करून आपल्या बापास संकटांत घालण्यास तुला शरम वाटली नाहीं, आणि आतां लोकांमध्यें आपली फजीती होईल ह्मणून तुला शरम वाटावी काय? तू जर मला अंतोपंताशीं खोट्या खतांचे संबंधानें झालेला पत्रव्यवहार न दाखविशील तर मी आतांचे आतां श्रीमंतांकडे जाऊन त्यांस सर्व मजकूर कळवीन आणि तेच तुझे घरांतून पत्रव्यवहार बाहेर काढितील. मग तुझा परिणाम काय होईल याची कल्पना तुझी तूंच कर.

**हरिपंतः**—[ विचार करीत उभा रहातो. ]

**बिल्व०ः**— अरे, विचार कसला करतोस! दाखवि-तोस कीं नाहीं तो पत्रव्यवहार? नाहीं तर हा मी चाललों. [जाऊं लागतो. ]

**हरिपंतः**— अहो, तुमच्या पायां पडतों, अंमळ थांबा.

**बिल्व०ः**—मी एक क्षणभर देखील थांबावयाचा नाहीं, आतांच्या आतां दाखीव मला तो.

**हरिपंतः**—बरें, दाखवितों, चला माझ्याबरोबर [ हरिपंत त्यास एके खोलीजवळ नेतो आणि तींत

अंधेर असल्याकारणानें दिवा पुढें करून ह्मणतो ] या खोलींत पत्रव्यवहाराचीं दप्तरें आहेत; या उजव्या बाजूस जिना आहे. दिसला कीं नाहीं; ( बिल्वकनाथ पुढें डोकें करून पाहतो, हरिपंत त्यास गचांडी मारून त्या तळघरांत लोटून देतो आणि बाहेरून कुलूप लावून निघून जातो.)

---

## प्रवेश ३.

स्थळ—हरिपंताचे घरांतील तळघर.

**बिल्वकनाथः**—अरे, त्या हरामखोरानें मला या तळघरांत लोटून दिलें! कोंडलेल्या हवेनें मी किती गुदमरून गेलों आहे! अरेरे! (नाक मुरडून) काय दुर्गंधि सुटली आहे येथें! इकडून तिकडे पाकोळ्या उडतांना माझ्या अंगावर हापटत आहेत! येथें सापांचीं किंवा (शहारे देऊन) विंचवांचीं जर बिळें असलीं तर आपलीं लवकरच शंभर वर्षे भरलीं असें समजलें पाहिजे! आतां येथून बाहेर पडण्याची तर आशाच नको. मी येथें मेलों तर माझ्या ह्मातान्या आईला ही खबर कोण सांगेल। मी पुष्कळ दिवस परत आलों नाहीं हें पाहून तिची काय अवस्था होईल ! शिव शिव! आईनें बाजीरावांस द्यावयाकरितां जें पत्र दिलें आहे, तें व देतां मध्येंच हें काय मी करून बसलों! तात्यासाहेब ते कोण माझे आणि मी कोण त्यांचा ! त्यांच्यासाठीं खटपट करून मीं आपला जीव मात्र धोक्यांत घालून घेतला. बरें असो ! इतकें तरी

चांगलें कीं परोपकाराच्या उद्योगांत मला मरण येत आहे. पण बाहेर पडण्याचा कांहीं तरी उपाय करावा! नाहीं सुटका व्हावयाची हें तर उघड आहेच. ( भिंती चांचपून ) ह्या भिंती तर मातीच्याच आहेत आणि हा-ताला ओलसर लागताहेत, यावरून उकरावयास सोपें जाईल असें वाटतें. पण उकरतां उकरतां एखादा साप ( शहारे देऊन ) फोसकिनी बाहेर पडला तर मग कसें होईल! पण येथें अन्नपाण्यावांचून कुजून मर-ण्यापेक्षां सर्पदंशानें एकदम मरणें बरें! ( काडीनें उकरूं लागतो, भिंतींतून उजेड पाहून ) उजेड दृष्टीस पडला यावरून भिंत संपली असावी असें वाटतें ( उकरून एक मोठा भोंसका करितो आणि त्यांतून डोकें बाहेर काढून पाहतो. ) ही एक जुनी पडकी विहीर आहे. हिच्या भिंतीवरून सहज चढून जातां येईल. बरें तर चढावें या भिंतीवर, ( चढून बाहेर पडतो; आवेशानें ) चाण्डाळा, हरिपंता, तात्यासाहेबांस आणि मला तूं मृत्यूचे तोंडांत विनाकारण देत होतास त्याजबद्दल तुझा सूड घेण्याकरितां परमेश्वरानें मला मुक्त केलें. अधमाधमा, तुझ्या ह्या दुष्कृत्याबद्दल तुझें यथायोग्य पारिपत्य न करीन तर मला सनातन नरकवास प्राप्त होवो. ( जातो. )

---

## प्रवेश ४ चवथा.

### स्थळ—सातारा येथें पिलंभटाच्या घरांतील एक खोली.

पिलंभट लोडाशीं टेंकला आहे.

**पिलंभटः**—रामकृष्णहरे, रामकृष्णहरे. ( शिंकतो. ) आज कोठलें आमंत्रण येणार आहे? आज लागोपाठ सात दिवस मला शिंका पूर्वेस येत असतात आणि सहा दिवस सहा ठिकाणाचीं आमंत्रणें आलीं. आज देखील पूर्वेच्यान दिशेस शिंक आली. पहावें आतां कोठलें तरी जेवणाचें आमंत्रण येतें किंवा नाहीं तें ( बजंभट येतो. )

**बजंभटः**—नमोनमः पिलंभट, ठीक आहेना?

**पिलंभटः**—यावें तुह्मी बजंभट, बसा असे. कोणीकडे स्वारी?

**बजंभटः**—इकडेसच आलों होतों. विठ्ठलपंत पटवर्धन आहेत ते, त्यांच्या घरीं पांच मेहुणें सांगितलीं आहेत जेवायाला. त्यांत मी एक मेहुण (बोटें घालून) तुह्मी दुसरे, दादंभट तिसरे, काकंभट चवथें, आणि कोटंभट पांचवें. अशीं पांच मेहुणें बोलाविलीं आहेत. बोलावणें पोचलेंना ? पिलंभट. लवकरचात्र वेत आहे. बरें. मी जातों आतां. [खांद्यावरचा रुमाल उडवितो.]

**पिलंभटः**—अहो बजंभट घाई कसली तुह्मला एवढी ? मला सांगा पाहूं पांच मेहुणें विठ्ठलपंतांनीं कशाकरितां बोलाविलीं आहेत तीं ?

**बजभटः**—अहो कशाकरितान् विशाकरिता काय

घेऊन बसलां अहांत? तुह्माला आह्माला तें काय घेऊन करावयाचें आहे? चमचमीत जेवण मिळालें आणि दक्षणा मिळाली ह्मणजे झालें. [ रुमाल उडवीत जातो. ]

**पिलंभट:**—शकुनमंजरीमध्यें सांगितलें तें कांहीं खोटें नाहीं, कीं पूर्वेस शिंक आली ह्मणजे मिष्टान्न मिळतें.

शिक्का वै दिशी पूर्वस्यां मिष्टान्नं प्रापयेत् खलु ॥

पूर्वेस शिंक आली ह्मणजे मिष्टान्न प्राप्त होतें असें जें शकुनमंजरींत लिहिलें तें खरें आहे. त्याचप्रमाणें इतर दिशेस आलेल्या शिंकांचींही फळें खरींच असलीं पाहिजेत. पुढचे चरण काय आहेत बरें? [ वर पाहून आठवितो. ]

शिक्का वै दिशि पूर्वस्यां मिष्टान्नं प्रापयेत् खलु ॥
क्षवथुर्दक्षिणस्यां चेत् शोकमानयति ध्रुवं ॥
पश्चिमस्यां क्षवो दद्यादंगनालिंगनं सुखं ॥
उत्तरस्यां क्षवः स्याचेदपारं धनमाप्नुयात् ॥

पूर्वेस शिंक आली ह्मणजे मिष्टान्न प्राप्त होतें तें खरें आहे. प्रत्यक्ष आपल्या अनुभवास आलें. दक्षिणेस शिंक आली ह्मणजे शोक प्राप्त होतो. आपल्याला शोक कांहीं नको आहे; बरें पुढें. पश्चिमेस शिंक आली ह्मणजे काय सुंदरी प्राप्त होते, आणि उत्तरेस शिंक आली ह्मणजे काय असंख्य द्रव्य प्राप्त होतें? आपल्याला सुंदरीची कांहीं फारशी जरूर नाहीं, पण अपार धन मिळेल तर बरें होईल. यासाठीं शिंक आली ह्मणजे उत्तरेस तोंड करावें ह्मणजे झालें. नाकांत

आतां धोतराची दशी घालून शिंक काढितों. ही पूर्व, ही दक्षिण, ही पश्चिम आणि ही उत्तर. (उत्तरेस तोंड करून) या दिशेस शिंक आली पाहिजे. (धोतराची दशी नाकांत घालतो, पण उत्तरेस तोंड फिरवायाच्या आधीं येऊन जाते.) अरेरेरेरेरे? एक शिंक वायां गेली ! बरें, निराश न होतां पुन्हा दशी घालून शिंक काढावी.

प्रयत्नो नैव त्यक्तव्यो न वै त्यज्यः कदाचन ॥
फलं वै लभते नैव सत्यो नैव संशयः ॥ १ ॥

(दशी घालून शिंक आणितो, पण पहिल्याप्रमाणेंच उत्तरेकडे तोंड करावयाच्याआधीं नाहींशी होते.] शिव ! शिव ! दोन शिंका वायां गेल्या आतां काय करावें बरें? [विचार करून] हां हां ! उत्तरेसच तोंड फिरवून बसावें आणि शिंक काढावी ह्मणजे झालें. [तोंड फिरवून बसतो व दशी घालून शिंक काढितो. मिटक्या मारून] आतां मात्र उत्तरेस शिंक आली, आतां आपल्याला द्रव्यप्राप्ति होईल.

॥ उत्तरस्यां क्षवः स्याच्चेदपारं धनमाप्नुयात् ॥

[ इतक्यांत सदोबा येतो. ]

सदोबाः—रामराम, सास्तरबुवा.

पिलंभटः—काय काम आहे रे ?

सदोबाः—येक प्रश्न इचारायाचा हाय म्हूनश्येनी आलुया.

पिलंभटः—काय प्रश्न आहे, बोल पाहूं !

सदोबाः—मी येक अनूपंत म्हून गिहिस्त हायति त्येंच्यासंग झटापटी करूनश्येनी लयलय पैका घेतलया.

पन मंग माझं मन मला खाऊं लागलं, म्हून तुमाकडं आलुया त्यो पैका मला पचल कीं न्हायीं म्हून इचार-न्यासाठीं.

**पिलंभटः**—अस काय? मी भगवद्गीता आणितों. तीमध्यें तूं काडी घालून एक पान काढ, ह्मणजे मी अर्थ करून तुला सांगतों. अग, ए, अग—काय शिंचीला करावें; मला ओच देत नाहीं. [मोठ्यानें] अगे ए-ए-ए.

**पिलंभटाची स्त्रीः**—( आंतून ) ओ-ओ-ओ.

**पिलंभटः**—( दांत ओंठ खाऊन. ) अग शिंच्ये इकडे ये, आणि मला ती भगवद्गीतेची पोथी दे काढून.

**पिलंभटाची स्त्रीः**—( येऊन ) पोरगी रडत होती तिला उगी करीत होत्यें ह्मणून थोडासा उशीर झाला, त्यांत इतकें चडफडावयास काय झालें मेलं. ( रागानें पहात उभी रहाते. )

**पिलंभटः**—अगे शिंदळिचे, ती भगवद्गीतेची पोथी आणून दे. उगीच माझ्या डोक्याशीं कटकट लावूं नकोस.

**पिलंभटाची स्त्रीः**—( पोथी आणून पिलंभटापुढें हापटते ) ही घ्या पोथी. ( जाते. )

**पिलंभटः**—( सदोबास ) ह्या पोथीमध्यें हें दांत-कोरणें घाल पाहूं ( सदोबा तसें करितो. )

**पिलंभटः**—( एक पान काढून वाचतो ) एक. ( वाचतो )

'अक्षराणामकारोऽहं द्वंद्वः सामासिकेषु च'

**सदोबाः**—काय अरथ त्येचा सास्तरबुवा?

**पिलंभटः**—सांगतों ऐक, भगवान् काय ह्मणतातः

अक्षराणामकारोहं म्हणजे काय कीं अ, आ, इ, ई, उ, ऊ, इत्यादि जीं अक्षरें ळ, क्षः, ज्ञः पर्यंत आहेत, त्यांमध्यें अ हें अक्षर जें आहे कीं नाहीं तें अक्षरच परमेश्वर. 'अं' हें अक्षर परमेश्वर आहे, तूं कोणाचें द्रव्य हरण केलें म्हणून म्हणालास ?

**सदोबाः**—अंतुपत हायति त्येंचें.

**पिलंभटः**—"अंतोपंत" यांतला शब्द आहे "अनंत" आणि "अनंत" या शब्दाचा प्रारंभ आहे 'अ' या अक्षरानें आणि 'अ' हें अक्षर परमेश्वर आहे. तेव्हां अनंताचें द्रव्य हरण करणें, म्हणजे परमेश्वराचें द्रव्य हरण करण्याप्रमाणें आहे. शांतं पापं! शांतं पाप! समजलास? तें द्रव्य परमेश्वराचें आहे, तें तुला पचावयाचें नाहीं. बरें पुढें [वाचून]

अक्षराणामकारोहं द्वंद्वः सामासिकेषु च

[वर पाहून] 'द्वंद्वः सामासिकेषुच' म्हणजे काय कीं सामासिक म्हणजे एकत्र झालेले, जुळलेले, लढाई करणारे. त्या लढाई करणारांमध्यें परमेश्वर जो आहे तो द्वंद्व आहे. द्वंद्व म्हणजे काय तर जोडी. त्या तंटा करणारांमध्यें भगवान् परमेश्वर आहे कीं नाहीं, तो द्वंद्वाप्रमाणें म्हणजे जोडीप्रमाणें आहे. तर याचा दाखला असा, कीं तूं जेव्हां अंतोपताशीं झटापट खेळत होतास, त्याकाळीं भगवान् परमेश्वर जोडी होते. म्हणजे त्या ठिकाणीं ते अदृश्यरूपानें होते. त्यांनीं तुला अंतोपंतापासून द्रव्य हरण करितांना पाहिलें. तर जें द्रव्य तूं चोरिलें आहेस, तें तुला कांहीं पचावयाचें नाहीं समजलास!

**सदोबाः**—(घाबरून) आतां कसें करावें शास्त्रबुवा ?

**पिलंभट**:–काय करावें ह्मणजे काय? कोणा-तरी गरीब शास्त्रीबावास दिलें पाहिजे.

**सदोबा**:–( हळहळून ) काय समदा बी पैका द्यायाला व्हावा?

**पिलंभट**:–सगळा ह्मणजे काय? जें जें कांहीं तूं अंतोपंतापासून हिरावून घेतलेंस, तें सारें दिलें पाहिजे समजलास.

**सदोबा**:–तुमासनी मी इतकी तसदी दिली, तर तुमीच घ्या समदा पैका ह्मणजे झालं.

**पिलंभट**:–( मनांत ) शिंकेचा प्रत्यय आलारे आला! ( मोठ्यानें ) कोठें आहे द्रव्य दाखीव पाहूं.

**सदोबा**:–( धोतराचें गांठोडें उघडें करून ) ह्यं पघा.

**पिलंभट**:–( मनांत थक्क होऊन ) माझ्या सात पिढ्यांना हें द्रव्य पुरेल. ( मोठ्यानें ) ठेव इथें तें द्रव्य. आतां तू पापापासून मुक्त झालास बरें. माझ्याकडे प्रश्न विचारायास आला नसतास, तर तुझ्या बेचाळीस पिढ्या निरय नामक नरकांत बुडाल्या असत्या. रामकृष्ण हरे! रामकृष्ण हरे!!

**सदोबा**:–[ शहारे देऊन ] बेचाळीस ह्मजे किती इसा शास्तरबुवा?

**पिलंभट**:–बेचाळीस ह्मणजे दोन इसा आणि वर दोन समजलास?

**सदोबा**:–दोन इसा अन् दोन इकत्या पिढ्या नरकामंदीं बुडाल्या असत्या व्हंय? तुमचे लई उपकार माझ्या डुईवर झाल्याती. जातो मी शास्तरबुवा.

**पिलंभटः**–जा बरें.

**सदोबाः**–( जातो. )

**पिलंभटः**–शिंकेचा प्रत्यय आला वाटा. द्रव्य तर खूपच आहे. पण आतां एकदां केव्हां तरी पश्चिमेस शिंक काढावी ह्मणजे ( मिटक्या मारून, भिवया वर चढवून ) सुंदर स्त्री मिळेल. शकुनमंजरी खरी आहे, ही शिंकेची युक्ति कोणाला सांगू नये आपण.

---

## प्रवेश ४ था.

स्थळ–हरिपंताची खोली. हरिपंत लोडाशीं टेंकला आहे.

**हरिपंतः**–अरेरे, त्या वैराग्यास तळघरांत लोटून देऊन मीं आपल्या अपराधांत भर घातली. एव्हांना तो तेथें मरून देखील गेला असेल. शिव शिव ! काय माझी स्थिति तरी? मला कांहीं झालें तरी सुख ह्मणून मिळावयाचें नाहीं असें वाटतें. माझें मन शुद्ध नसल्या कारणानें मला कधीं स्वस्थपणें झोंप देखील येत नाहीं. बोलतांना, चालतांना, सदोदित माझीं पापें माझ्या डोळ्यांपुढें उभीं असतात. एक पाप केलें, तें झांकून टाकण्याकरितां दुसरें करावें, दुसरें झांकून टाकण्याकरितां तिसरें करावें, याप्रमाणें पहिल्यापासून माझा क्रम चालला आहे. प्रथमच पाप केलें नसतें, तर ही दुष्कृत्यांची परंपरा माझ्या हातून कशाला घडली असती? ( अंतोपंत येतो. )

**अंतोपंतः**–नमस्कार हरिपंत!

हरिपंतः--नमस्कार.

अंतोपंतः--हरिपंत, आजपर्यंत मी जसा सदोदित तुझ्या हिताकरितां झटलों, तसें यापुढें ही झटावें, असा माझ्या मनाचा संकल्प आहे. तुला आठवतच असेल, कीं मी तुला एकदां एक सुरेख बायको पाहून देईन ह्मणून सांगितलें होतें?

हरिपंतः--हो पुरतें आठवतें (मनांत)---कोणत्या संधानानें तो बोलत आहे बरें? दुसरें कसलें संधान, रुपये उपटावयाचेंच दुसरें काय? या खेपेला त्याला फसवावयाचें नाहीं असा निश्चय करितों.

अंतोपंतः--तर मी तुह्मासाठीं एक सुरेख बायको योजिली आहे. काल ती मुलगी आपल्या दासीबरोबर (ती तिची दासीच असावी असें मला वाटतें) महालक्ष्मीचे देवळास जात होती. तिला मीं माडीवरून खालून जातांना पाहिली. तिचे केश काळेभोर असून मध्यें एक बारीक भांगाची रेषा होती, तिच्यामध्यें एक शेंदराचा टिपका दिला होता. तिचें कपाळ कसें रुंद अर्धचंद्राकार होतें! तिच्या भिंवया धनुष्याप्रमाणें कमानदार होत्या. तिचे डोळे कसे काळेभोर आणि मोठे होते. आंगावर दागिने बिगिने कांहीं फारसे नव्हते, पण दागिन्यांनीं तिच्या सौंदर्यांत भर पडलीच नसती.कारण दागिन्याशिवायच ती सौंदर्याचे शिखरास जाऊन पोहोंचली होती! (अंतोपंत सहज खिडकींतून पाहतो, इतक्यांत ती मुलगी दासीसह खालून जाते.)

अंतोपंतः--हरिपंत, या लवकर इकडे. रस्त्यांतून

पहा तीच मुलगी चालली आहे. (हरिपंत पाहून थक्क होऊन जातो.)

**हरिपंत**:-(मनांत)मीं आतां इतक्यांतच निश्चय केला होता, कीं अंतोपंताशीं तुटक रीतीनें वागावयाचें म्हणून; पण या स्त्रीचें सौंदर्य पाहून आपला मनोनिग्रह नाहींसा झाला आहे.(मोठ्यानें) अंतू, तूं वर्णन केलेंस त्यापेक्षांही जास्ती सुंदर आहे; ही मजजवळ नेहमीं असावीशी वाटते. तर या करितां ती कोण आहे, कोठली वगैरे चौकशी करून मला कळीव. तसेंच, ती मजजवळ रहाण्यास खुषी आहे किंवा नाहीं, याचाही खुलासा काढ. आणि जरी ती खुषी नसली तरी—

**अंतो०**-समजलों मी तुह्मी काय ह्मणणार तें. त्या रखमी प्रमाणें—

**हरि०**:-(हळू) बस बस तसेंच कर ह्मणजे झालें.

**अंतो०**:-(मनांत) येथें खूप मोठा डल्ला मारण्याची वेळ आहे. (मोठ्यानें) पण हरिपंत या गोष्टीस पैसा पाहिजे, आणि गोष्ट सिद्धीस गेली तर मला चांगलें बक्षीस दिलें पाहिजे.

**हरि०**:-हे घे सध्यां दोनशें रुपये. आणि ती मुलगी मला मिळवून दिल्यावर मग आणखी दोनशें रुपये तुला बक्षीसादाखल देईन.

**अंतो०**:-दोनशाचेंच जर बक्षीस असेल तर आपल्याच्यानें नाहीं बोवा काम व्हायचें. आपल्याला पांचशें पाहिजेत.

**हरिपंत**-अंतोपंत, तीनशें घे. आणि काम कर.

**अंतोपंत**-मला पांचशें पाहिजेत.

**हरीपंत**--बरें, चारशे घे मग तर झालें कीं नाहीं.

**अंतोपंत**--पांचशेला एक कवडी कमी घेणार नाहीं. काम कांहीं सोपें नाहीं. पांचशें द्यावयास खुषी असला, तर काम करितों, नाहीं तर नाहीं.

**हरीपंत**--(मनांत) पहा अंतू कसा अट्टल सोदा आहे तो. माझ्या हितासाठीं सदोदित झटण्याचा त्यानें निश्चय केला आहे, असें तो म्हणतो; पण पांचशेला एक कवडीही कमी घेत नाहीं. (मोठ्यानें) बरें पांचशें घे आतांतर झालेंना.?

**अं० पं०**:-आतां काय? तीन दिवसांत ती मुलगी तुझ्या पलंगावर न बसली तर माझें नांव मी बदलून ठेवीन. (जातो)

**ह० प०**:-(मनांत)अंतूची हरामखोरी पाहून माझ्या पायांची आग मस्तकास चढते. बरें, मी शपथ वाहतों कीं ही स्त्री मिळाल्यावर मी अंतूशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करणार नाहीं म्हणून. अहाहा, काय त्या स्त्रीचें सौंदर्य! बरें, झाली गोष्ट नी झाली. पुन्हां अंतोपंताच्या तावडींत सांपडावयाचें नाहीं.

**अं०प०**:-(जातां जातां वाटेंत हांसून) मीं पांचशें पेक्षां जास्ती जरी रुपये मागितले असते तरी हरीनें ते दिले असते. (मिशांवर ताव देऊन) पण काय चिंता आहे? हरिपंताची सर्व जिंदगी पुढें मागें केव्हां तरी माझीच होणार आहे. (हांसून) माझ्या बुद्धीपुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं!

## प्रवेश ९ वा.

स्थळ:—सातारा येथें अंतोपंताचे घरातील

एक खोली.

**अं० पं०**:—आजपर्यंत जसें मी शेंकडों स्त्रियांस फसविलें आणि त्यांस वश करून घेतलें, त्याप्रमाणें या मुलीस देखील वश करून घेईन; नाहीं तर मी आपलें नांव बदलून ठेवीन! हरिपंताच्या जवळून आज दोनशें रुपये उपटले, आणि पुढें आणखी पांचशें उपटणार. बरें हे पांचशें मिळाल्यावर पुढें कोणत्या रीतीनें बरें आणखी त्याच्यापासून उपटावे? बरें, पुढचें पुढें. त्याची काळजी इतक्यांत कशाला?. जोंपर्यंत माझी तीक्ष्ण बुद्धि मजजवळ आहे, तों पर्यंत कांहीं तरी उपायांनीं मी हरिपंतापासून पैसे उपटितच राहीन. हरिपंत बिचारा अगदींच भोळा! त्याची मला कधीं कधीं दया येते पण दुनियेमध्यें त्याच्यासारखे भोळे लोक आहेत, ह्मणूनच आह्मांसारख्यांना डल्ला मारावयास सांपडतो. बरें, मी गोविंदपंत माझा विश्वासू कारकून याला पाठविलें होतें; तिकडून तो अजून कां बरें नाहीं आला?

(गोविंदपंत येतो.)

**गोविंदपंत**:—नमस्कार.

**अंतोपंत**:—बसा, मी आतांच तुमची आठवण केली होती. तुह्मी फार दमलां असाल?

**गोविंदपंत**:—दमलों ह्मणजे काय? आज दोन

दिवस फोडणीच्या पोह्यांवर आहे! बारा तास घो-ड्यावर बसून साताऱ्यास आलों! हुश!

**अतोपंत**-बरें तुह्मी ज्या करितां गेलां होतां, तें काम फत्ते झालें किंवा कसें?

**गोविंदपंत**-हो फत्ते झालें तर? तात्यासाहेब येथील तुरुंगांतून पळून गेल्यावर तुह्मी मला पन्नास रुपयांचें बक्षीस देऊन सांगितलेंत कीं, कसें तरी करून त्यांना पकडून दे मग तावडतोब मी येथून एक उ-मदा घोडा घेऊन पुण्यास गेलों, कारण मला वाटतच होतें, कीं तो पुण्यास जाऊन सगुणाबाईस घेऊन कोठें-तरी उत्तर हिंदुस्थानांत चालला असावा; यावरून मी पुण्यास गेल्यावर प्रथम नारोबा कोतवालाच्या घरीं गेलों, आणि माझें काम सांगून कांहीं शिपाई मागितले. त्यानें सगुणाबाई आपल्या हातून कशी निसटून गेली, व तिला शोधावयास जात असतां तात्यासाहेब वगैरे कसे भेटले, इत्यादि हकीकत सांगितली; आणि ह्मणाला, सगुणाबा-ईस धरून द्याल तर तुह्मांस चाळीस रुपये बक्षीस देईन. त्याचें ह्मणणें कबूल करून मी तेथून चार शि-पाई घेऊन, तात्यासाहेब आणि सगुणाबाई यांच्या शोधार्थ निघालों. जातां जातां रात्र झाली ह्मणून आह्मी एका खेड्यांत उतरलों. तेथें एका घरांत आह्मी गेलों आणि रात्रीची बसतीस जागा मागितली. परंतु घरची बाई जराशी गोंधळांत पडली, आणि मग ह्मणाली, बाबांनो हें घर फार लहान आहे. येथें तुह्मांस कशी जागा मिळेल? ती प्रथम गोंधळांत पडली यावरून मला शंका आली कीं, येथें कांहीं तरी गूढ आहे.

इतक्यांत अचानक तेथें तात्यासाहेब आले. त्यांस पाहिल्याबरोबर आह्मीं त्यांस पकडिलें आणि घरांत शिरलों. तों सगुणाबाई दृष्टीस पडल्या. त्यांनाहि आह्मीं पकडलें. त्या दोघांस घेऊन आह्मी पुण्यास आलों, आणि त्यांस नारोबा कोतवालाचे स्वाधीन केलें. व कोतवालजींनीं मला चाळीस रुपये सगुणाबाईस धरून दिल्याबद्दल बक्षीस दिले, आणि मग ही आनंदाची खबर कळविण्याकरितां ताबडतोब तुमच्याकडेस आलों. कशी काय कामगिरी बजाविली?

**अतोपंतः**—अगदीं सोळाआणे. हें घ्या तुमचें बक्षीस.

**गोविंदपंतः**—( घेऊन ) मी जातों आतां घरीं जेवायास ( जातो. )

## तिसरा अंक समाप्त.

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

स्थलः—सातारा येथील एक रस्ता.

( वाराणशी आपल्या सखीबरोबर देवीचे देवळांत जात आहे, मागून पिलंभट )

पिलंभटः-( मिटक्यामारून ) अहाहा ! काय स्त्री आहे पण खुपसुरत ! तिचें एकवार जर मला आलिंगन मिळेल, तर मी किती धन्य होईन! अरे ! काय प्रभाव आहे ह्या मदनाचा? मी इतका म्हातारा झालों आहे, तरी ही स्त्री पाहून माझ्या अंतःकरणांत कशी चळवळ सुरू झाली आहे? अहाहा ! हिच्याकडे टक लावून पाहात उभें रहावेंसें वाटतें. हिचें सौंदर्य असें कांहीं आहे कीं, ह्या डोळ्यांनी हिच्याकडे कितिवेळ जरी पाहिलें, तरी ते तृप्त होणार नाहींत असें वाटतें. ही आपणास कशी मिळेल बरें ? बरें ? हिच्याकडे पाहून जसा मी मोहून गेलों आहे, तशी ती देखील माझ्याकडे पाहून मोहून जाणार नाहीं म्हणून कशावरून ? आणि ती जर मला पाहून भुलली, तर मग काय ' माझी इच्छा तेव्हांच तृप्त होईल. या सार्टीं मी आपलें सुंदर शरीर तिच्या डोळ्यांसमोर आणितों. ( वाराणशीपुढें लंगडत लंगडत जाऊन तिच्याकडे तोंड करून उभा राहतो. ती त्याच्याकडे न पाहतां पुढें जाते. )

पिलंभटः–( दुःखानें ) अरेरे ! तिनें माझ्याकडे पाहिलें देखील नाहीं! बरें आतां काय करावें ? हो हो

एक युक्ति आठवली मला. शकुन मंजरींत लिहिलें आहे कीं:-

पश्चिमस्यां क्षवो दद्यात् अंगनालिंगनंसुखम् ॥

तर आतां पश्चिमेस शिंक काढली ह्मणजे झालें. ही पूर्व, ही दक्षिण, ही पश्चिम, आणि ही उत्तर. पश्चिमेस ह्मणजे या दिशेस ( बोट करून ) शिंक आली पाहिजे. नाकांत धोतराची सुरळी घालून शिंक आणिली पाहिजे. ( शिंक येते, पण पश्चिमेस तोंड फिरवायाचे आधींच येऊन जाते. ) (हळहळून ) शिवशिव! दक्षिणेस शिंक आली आतां शोक प्राप्त होईल!

क्षवथुर्दक्षिणस्यां चेत् शोक मानयति ध्रुवम् ॥

तर आतां मुकाट्यानें निघून जावें हें बरें. ती स्त्री आज आपणास प्राप्त होत नाहीं. ( जाऊं लागतो. ) पण बुवा माझा पाय कांहीं या स्त्रीला सोडून मला जाऊन देत नाहीं. बरें काय होईल तें होवो, या स्त्रीचें तर एकवार आलिंगन घेतोंच. ( लगडत लंगडत तिच्यापाशीं जातो, आणि तिच्या अंगावर हात टाकणार इतक्यांत अंतोपंत येतो. )

अं० पं०:-(मनांत) हीच स्त्री हरिपंतासाठीं आपणास वश करावयाची आहे. तर ही सधी उत्तम आहे तिच्याशीं ओळख करून घेण्यास. ( मोठ्यानें ) अरे दुष्टा दूर हो. खबरदार त्या स्त्रीस हात लावशील तर !»

( अंतोपंत पिलंभटास जमिनीवर झुगारून देतो. )

पिलंभटः--दक्षिणेस शिंक आली त्याचें फळ हें. आतां माझें आंग ठेंचून गेलें आहे. तर कसचा देव

मी करावें काय? घरींच जावें हें बरें. रामकृष्ण हरे! रामकृष्ण हरे!! (जातो.)

**अंतोपंतः**--बाई तुह्माला कोठें जावयाचें आहे तें मला सांगा ह्मणजे मी तुह्मांला तेथवर नेऊन पोंचवितों.

**दासीः**--आह्मांला मंगळवार पेठेंत जावयाचें आहे.

**अं० पं०ः**--बरें चला मी तुह्मांला तुमच्या घरापर्यंत नेऊन पोंचवितों; नाहीं तर त्या ह्मातान्यासारखा दुसरा कोणी दुष्ट तुह्मांला भेटेल आणि तुमच्या अंगाला लगटूं लागेलबिगेल एखादा.

**वाराणशी आणि दासीः**--बरें चला तुमचे आह्मांवर फार फार उपकार होतील.

**अं० पं०ः**--उपकार कसले. (मनांत) तुह्मी मला तुमच्या बरोबर येऊं देतां हे तुमचेच उपकार माझ्यावर झाले ह्मणायाचे. (चालतात.)—

**दासीः**--(घराशीं जाऊन) हें आमचें घर. बाईसाहेबांचें आपणांस असें म्हणणें आहे कीं घरांत येऊन थोडासा फराळ करून मग जावें.

**अं० पं०ः**--तुमच्या बाईच्या आग्रहास्तव मी फराळ करावयास राहतों (मनांत) येथपर्यंत तर काम नीट निभावलें.

(घरांत गेल्यावर दासी पेढे, बरफी फळफळावळ वगैरे एका ताटांत घेऊन येते.)

**वाराणशीः**--फराळ करावयास सुरवात करावी आतां.

**अं० पं०ः**--(फराळ करितो) (दासीस) बाई तुम्ही माझा आदर सत्कार केलात त्यावरून मला एक

गोष्ट विचारावीशी वाटते ती तुम्ही सांगावयाला अनमान करणार नाहींसें वाटतें.

दासी:--काय विचारावयाचें आहे तें ऐकुंद्या बरें.

अं० पं०:--तुमच्या यजमानीणबाई राहणाऱ्या कोठल्या? त्या येथें एकट्याच कशा राहतात, त्यांचे आईबाप कोण वगैरे हकीगत मला विचारावीशी वाटते. तर ती मला कळविण्यास कांहीं चिंता नसल्यास तुम्ही मला कळवाल तर घटकाभर करमणूक होईल.

वाराणशीः–( दासीला ) अग चिंता कसली आहे. सांग माझ्या फुटक्या नशिबाची हकीगत त्यांना.

अं० पं०:–बाई ह्या गोष्टीचें कथन केल्यानें जर तुह्मांला दुःख होईल तर मला ती ऐकण्याची इच्छा नाहीं.

वाराणशीः–तुमची आणि आमची कांहीं देखील ओळख नसतां तुह्मी आह्मांला त्या थेरड्याच्या हातून सोडवून आमच्या घरीं आणून सुरक्षितपणें पोंचविलेंत, त्या अर्थी आपण आह्मांला मित्राचे ठिकाणीं अहांत. आणि मित्राचे पुढें आपल्या दुःखाची हकीगत सांगितली ह्मणजे दुःख कमी होतें; ह्मणून मी आपली हकिगत तुह्मांला सांगतें. मी जुन्मल गांवांतील एका श्रीमत कुणबी सावकाराची मुलगी आहे. त्याला मी एकुलती एकच मुलगी होतें ह्मणून त्यांची माझ्यावर फार प्रीति होती. त्यानें मला लहानपणीं लिहावयास वाचावयास आणि गावयास पंतोजीकडून शिकविलें. आणि पुढें मी उपवर झालें तेव्हां त्यानें माझें लग्न एका श्रीमंताचे मुलाशीं लावून दिलें. पुढें माझ्या दुर्दैवानें माझे आईस बाप चार-

त्यामुळें ती मरण पावली. ( अश्रू ढाळते ) तिच्यावर माझ्या बापाची फारच प्रीति असल्यामुळें तोही पत्नी शोकामुळें लवकरच मरण पावला. ( रडते ) याप्रमाणें मला माहेर नाहींसें झालें. पुढें जेव्हां मी वयांत आलें, तेव्हां माझी आणि माझ्या पतीची * प्रथम भेट झाली, परंतु शिव शिव ! माझें नशीब फुटकें—

**दासी** ( यजमानणीस ) बाळूबाई, तुमची उरलेली गोष्ट मी पुरी करितें.

( अंतोपंतास ) मग दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाईनीं रडत रडत रात्रीचा वृत्तांत सांगितला, आणि वैतागानें घरांतून पळून जाण्याचा निश्चय केला. त्यांनीं मला विचारलें, तूं माझ्या बरोबर येशील किंवा नाहीं. त्यांना सांगितलें बाई तुह्मी जाल तिकडे मी यावयास राजी आहे. मग आह्मी वेष पालटून गुप्तपणें निघालों व साताऱ्यास येऊन पोंचलों. आमच्या बाईचा येथें येण्याचा इरादा इतकाच कीं, कोणातरी श्रीमंत सुरेख आणि तरुण अशा एखाद्या—

**वाराणशीः**–[ रागानें दासीकडे पाहते. ]

**दासीः**–मनुष्याच्या पदरीं राहावें.

**अं० पं०:**–( मनांत) आज मी घरून मोठ्या चवाड मुहूर्तावर निघालों होतोंसें वाटतें, कारण सर्व काहीं गोष्टी मला अनुकूलच होत चालल्या आहेत.(मोठ्यानें) [ दासीस ] कोणातरी श्रीमंत सुरेख आणि तरुण अशा मनुष्याचे पदरीं राहण्याचा त्यांचा इरादा आहे काय ?

**दासीः**—होय.

**अं० पं०:**—या कामीं तुह्मांला थोडीशी मदत

मला करितां येईल असें वाटतें. तुम्हांला येथें आल्यास किती दिवस झाले.

**दासी**:–नुकते, आठ दिवस. आम्हांला येथील कांहीं माहिती नाहीं आणि तुम्ही मदत केलीन तर तुमचे आम्हांवर फार उपकार होतील.

**अं० प०**:—बाई, उपकार कसले. तुमची आणि आमची आतां ओळख आहे त्यावरून तुम्हांला माझ्याकडून होईल तितकी मदत करावयास मला म्हटलेंच पाहिजे. बरें. आज मंगळवार पेठेंतून येतांना दोन टोलेजंग हवेल्या आहेत त्या तुम्हीं पाहिल्याच असाल.

**दासी**:–होय पाहिल्या.

**अं० प०**:–त्या हवेल्यांचा मालक माझा परम मित्र आहे. तो मोठा सवांगर आहे. सौंदर्यानें तो मदनाप्रमाणें आहे. आणि वयानें तीसांपेक्षां जास्ती नाहीं.

**वाराणशी**:–एके दिवशीं तुम्ही आणि दुसरे एक गृहस्थ त्याच हवेल्याजवळून एकमेकांचे खांद्यावर हात टाकून चालला होतां तेच गृहस्थ कीं काय तुम्ही म्हणतां ?

**अं० प०**:–कधीं बर ?

**दासी**:–मागल्या सोमवारीं.

**अं० पं०**:–हो, हो. तेच तेच. आम्ही एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून चाललों होतों खरें. बरें तुम्हीं त्यांना पाहिलें आहेच. तर मी सांगतों त्याप्रमाण ते सुरेख आणि तरुण आहेत किंवा नाहींत ? कीं मी तुम्हांला उगीच फुगवून सांगतों ?

**वारा०**–खरोखरच तुम्ही सांगतां त्याप्रमाणें आहेत

दासी—आणि त्यांना वारुबाईनीं पाहिलें तेव्हांपासून ते त्यांच्या मनांत फार भरले आहेत.

अं० पं०:—खरेंच कीं काय? (मनांत) आज काय सर्व गोष्टी मला अनुकूलच घडत आहेत. (मोठ्यानें) असें जर आहे तर तुमच्या मनाप्रमाणें यजमान तुह्मांला मिळालेच ह्मणावयाचें. कारण हरिपंतांनीं जेव्हां मला स्त्री शोधावयास सांगितलें तेव्हां ते ह्मणाले कीं, अंतू, मला स्त्री पाहिजे ती अशाप्रकारची पाहिजे. तिचे डोळे काळे मोर आणि विशाळ असे पाहिजेत. तिच्या डोळ्यांच्या पापण्या लांब आणि रेशमाप्रमाणें मऊ अशा असल्या पाहिजेत. तिचें नाक चाफेकळीप्रमाणें असावें. तिच्या गालाचा वर्ण कोंवळ्या गुलाबाच्या फुलाप्रमाणें असावा. तिचे दांत बारीक बारीक असून मोत्याप्रमाणें शुभ्र असावेत. तिच्या ओठांचा रंग लाल भडक असावा. तिची हनुवटी निमुळती असावी ती हंसूं लागली म्हणजे तिच्या गालावर आणि हनुवटीवर खळग्या पडाव्यात. तिचें कपाळ विशाळ असावें. तिच्या भिंवया जाडी आणि कमानदार असाव्यात. आणि एकंदरींत तिचें शरीर असें असावें कीं, तिच्याकडे पाहिलें कीं तिला बाहुपाशांत अनंतकाळ पर्यंत कवटाळून ठेवण्याची इच्छा व्हावी. या सर्व गुणांनीं युक्त अशी स्त्री हरिपंतांना पाहिजे. आणि हे सर्व गुण तुमच्यामध्यें आहेत. कां मी म्हणतों तें खरें आहे किंवा नाहीं. [दासीकडे पहातो.]

वाराणशीः—[लाजते]

दासीः—पण आमच्या बाई हरिपंताच्या पदरीं

रहावयास कबूल होण्याचे पूर्वी त्यांच्याकरितां मी ही एक गोष्ट मागून घेतें कीं, त्यांना हमेशा जरीच्या चोळ्या आणि रेशमी लुगडीं पाहिजेत. त्यांना दागिने नेहमीं भरगच्च पाहिजेत. म्हणजे ज्या स्वरूपाचें तुम्ही त्यांचें वर्णन केलेंत तें जास्ती खुलेल.

वाराणशीः–[ मुरका मारते. ]

अं० पं०:–अहो या गोष्टीची कांहीं कमताई पडावयाची नाहीं, त्या तुमचे बाईस रेलचेल मिळतील. बरें तर मग. हरिपताकडे केव्हां येण्याची तुमची खुषी आहे.

वाराणशी आणि दासीः–उद्यां सकाळीं आपण आह्मास तिकडे घेऊन जा.

अं० पं०:–बरें आहे तर उद्यां सकाळीं मी तुमच्या घरीं येईन तुह्माला हरिपताकडे घेऊन जावयास. (मनांत) आजच्याप्रमाणें सुलभ रीतीनें कार्य कधींच तडीस गेलें नाहीं. हरिपंतापासून आतां आणखी पांचशें रुपये मिळतील.

( जातो. )

---

प्रवेश २ रा.

स्थळः–अंतोपंताची खोली.

अं० पं०:–आज तर वाराणशीस मिळवून दिल्याबद्दल हरिपंतापासून सातशें रुपये उपटले. ( खिसा खुळखुळतो. ) आणि त्या सातशेंच्या मानानें पाहतां माझी कामगिरी फारच सोपी होती. मला वाराणशीचें

मन वळवण्यास बिलकुल श्रम पडले नाहींत आणि बरोबर आहे. ती सातान्यास कोणातरी श्रीमंताचें अंगवस्त्र ह्मणून राहण्याकरितांच आली होती. मग काय मी गोष्ट काढावयाचा उशीर. ती लागलीच हरिपंतापाशीं राहण्यास कबूल झाली. अहाहा ! वाराणशीची सुंदर मूर्ती डोळ्यापुढें आली ह्मणजे कांहीं विलक्षण प्रेमाच्या लाटा अंतःकरणांत उत्पन्न होतात. तूं इतकी सुंदर आहेस कीं, आमचे राजे बाजीराव साहेब यांच्या गळ्यांत लटकून राहण्यास योग्य आहेस. ( विचार करून ) हो हो असें केलें ह्मणजे आपणांस पचवीस तीस हजार रुपये सहज मिळून जातील. आपले स्त्रीलंपट बाजीराव साहेब.येथें कांहीं राज्यकारणास्तव आले आहेत तर त्यांच्याकडे जाऊन त्यांस सांगावें कीं, अप्सरेप्रमाणें एक सुंदर स्त्री सातान्यामध्यें आली आहे. आपण जर मला पंचवीस हजारांचें बक्षीस द्याल तर ती तुह्मांस मी मिळवून देईन. ते इतके स्त्रीलंपट आहेत कीं, माझें म्हणणें तेव्हांच कबूल करतील. आणि मग काय बाजीरावास सांगावें कीं, वाराणशी रात्रीं तुम्हास हरिपंताचे घरीं सांपडेल. इतकें सांगितलें म्हणजे झालें. सरकारचे शिपाई परस्पर तिला हरिपंताचे घरांतून घेऊन जातील ह्मणजे हरिपंताचे मनांत माझे विषयीं कांहीं संशय येणार नाहीं. बाजीरावाकडून पचवीस तीस हजार कांहीं तरी मिळतील आणि आधीचे हे सातशें मिळाले आहेत ते तर आहेतच आणि इतकें करून आपली लबाडी गुप्त राहिल ती राहीलच. अरे कल्पना पण कल्पना ! अव्वल प्रतीची

कल्पना माझ्या मनांत आली. [ हांसून, पाठिवर हात थोपटून घेऊन ] अव्वल प्रतीची म्हणजे काय, ह्या अनोपंताची कल्पना अव्वल प्रतीची असावयाचीच. बरें श्रीमंतांची आतां गांठ कोठें पडेल? पण हे विसाजीपंत इकडे कोणीकडे? नमस्कार वि-साजीपंत! नमस्कार विसाजीपंत! नमस्कार! अनोपंत, ठीक आहेना?

पण नक्की पुण्याहून इकडे वाटतें.

कोणीकडे आलात? कांहीं कामधाम आ काम नाहीं.

विसाजीपंत—माझें स्वतःचें कांहीं आले आहेत पण श्रीमंत सातान्यास कांहीं कामाकरितां त्यांचे बरोबर मी इकडे आलों आहे.

अ० पं०—आणि धोंडोपंत कोठें आहेन?

विसाजीपंत—ते आजारी आहेत म्हणून तर त्यांचे बरोबर मी आलों आहे. पण वि-

अ० पं०—असें काय! आले आहेत बरें? साजीपंत, श्रीमंत येथें कशा करितां? कशाकरितां? आप-

वि० पं०—अहो कशाकरितांन् हे? पण गुणगुण त्याला तें घेऊन काय करावयाचें इंग्रजांचे डाळ्यात अशी आहे कीं, म्हैसूरचा टिपूसुलतान गच्या तरी रीतीनें भारी सलत आहे. त्याचा पाडाव क नांनीं श्रीमंतांकडे करावा असें मनांत आणून इंग्र जासूद खलिता कुमक देऊन पाठविला आहे. तर त्याला उत्तर काय द्यावें वगैरे गोष्टी विषयीं श्रीमंत छत्रपती महाराजांचा सल्ला घेण्याकरितां श्रीमंत येथें आले आहेत. ते नुकतेच खलबत

करून परत आपल्या वाड्यांत येऊन जरा विश्रांति घेत बसले आहेत. राजे लोकांस त्रास राजे लोकांसच आऊक. बरें पण मला उशीर झाला. मी जातों आतां! अलोपंत पुन्हां तुमची आमची भेट बहुतकरून व्हावयाची नाहीं, कारण श्रीमंत उद्यांच पुण्यास जाणार आहेत. नमस्कार, नमस्कार,

अ० पं०–नमस्कार [ त्रि. पं. जातो. ]

अं० पं०–श्रीमंत आतां राजवाड्यांत आहेत तर तिकडेच जावें आपण:– [ जातो. ]

---

### प्रवेश २ रा.

स्थळः—हरिपंताचा रंगमहाल.

[ हरिपंत आणि वाराणशी पलंगावर बसलीं आहेत ]

वाराणशी:--( विडा पुढें करून ) हा घ्या.

ह० पं०–( विडा घेतो ) प्रिये तूं एखादें मधुर गाणें गा पाहू.

वारणशी:–[गाते]

पद.

रमण चरण कमल विमल मानिहो भजाया ॥ध्रु०॥

स्मृत पतिपद एक हि पल,
शमविसते दुरित सकल
घडवितसे हृदय विमल । करणउपाया ॥ध्रु.॥
आभरणें द्रव्य अतुल,
दासी रथ पट हि विपुल,
समजाणे अल्पमोल । पतिशीं गणाया ॥ध्रु.॥

भव विपदभितभु चेत
होत अस त्वारत सुखत ।
पद पतिचें बाइ सतत । धरितां मनीं या ॥धृ.॥

हरिपंतः—प्रिये खाशी खाशी, काय बहार करून सोडलीस. आज हा रंगमहाल शोभविणारह्मणून पहा केशी तयारी करून ठेविली आहे ती. या पहा कशा सुरेख तसबीरा भिंतीस टांगून ठेविल्या आहेत त्या? ये इकडे, ह्मणजे तुला सान्या दाखवितों [एका तसबीरी खालीं उभाराहतो.] प्रिये ही तसबीर पाहिलीस; हें वि-

[illegible]

ला आहे तो. त्याचें तोंड मात्र उघडें राहिलें आहे. बाकी सर्व शरीराभोंवतीं पहा केवढें वारूळ वाढलें आहे तें. याच्या जटांमध्यें पहा पक्ष्यांचीं कितीं घरटीं आहेत तीं. पांखरें त्याच्या डोक्यावर काढली आहेत तीं कशीं हुबेहुब उडत आहेतशीं दिसताहेत

वाराणशीः—खरेंच? सारीच तसबीर फार सुरेख काढली आहे. इच्याचकडे एकसारखें पहात उभें राहावेंसें वाटतें.

हरिपंतः—वाराणशी हिच्या ही पेक्षां जास्ती सुरेख तसबीरा पुढेंच आहेत. (चालतात) प्रिये, ही पहा तसबीर! विश्वामित्र तपोनिधीच्या उग्र तपानें इंद्र भिऊन गेला आणि त्यानें त्याच्या तपाचा भंग करण्याकरितां मेनकेस पाठविलें ती तपोनिधीचे आश्रमांत येऊन त्याचें मन लोभवीत आहे त्या प्रसंगाचें हें चित्र आहे. पहा मेनका कशी मुनीच्या पुढें येऊन नाचत आहे ती? तिचा चेहरा पहा कसा सुरेख आहे तो (पुढें चालतात)

ही पहा तसबीर! हीमध्यें विश्वामित्र आपलें तपश्चरण सोडुन देऊन मेनकेला आलिंगीत आहे असें चित्र काढलें आहे. तुह्मी बायका ह्मणजे अशा कांहीं आहात कीं तुमच्यापुढें मनुष्याचें, ऋषींचें, देवांचें, कोणाचेंही कांहीं चालत नाहीं.

**वारणशीः**—(हसते)

**हरिपंतः**—प्रिये ही पहा पुढची तसबीर. दुष्यंत व शाकुंतला यांची लतागृहांत भेट झाली त्या प्रसंगा! हें चित्र आहे. [ चालतात. ] प्रिये, ही पहा तसबीरेंत कृष्ण आपल्या गोपींसह रास खेळत आहे असें हें तें चित्र काढिलें आहे. [ पुढें चालतात ] प्रिये, ही पहा तसबीर! गोपी नदीमध्यें स्नान करीत होत्या तेव्हां कृष्ण त्यांचीं लुगडीं वाळवंटावरून उचलून घेऊन गेला आणि कळंबाचे झाडावर बसला तेव्हां गोपी त्याच्याकडे लुगडीं मागावयास आल्या त्या प्रसंगाचें हें चित्र आहे. प्रिये तो पहा कृष्ण कसा हांसत आहे तो!

**वाराणशीः**—माझे बाई पाय उभे राहून दमून गेले आणि माझी मान वर पाहून अगदीं दुखूं लागली. [ जांभई देऊन ] आतां बाई बरीच रात्र झाली असेल. निजावेंसें वाटतें.

**हरिपंत.**—बरें तर चल आतां पलंगावर.

[ पलंगावर बसतात. ]

**हरिपंतः**—( वाराणशीच्या अधराचें चुंबन घेतो. ) प्रिये या वेळीं मी इंद्राच्या नंदन वनामध्यें अप्सरांबरोबर क्रीडा करीत आहे असें वाटतें. तुला मी आ-

पलें सर्वस्व अर्पण करितों तुझ्यावर मी चिरकाल प्रीति करीत जाईन.

**वाराणशी.**—प्रिया ? एकमेकांची प्रीति एकमेकांवर चिरकाल रहावी या करितां दोघांच्या अंतःकरणांचा मिलाफ झाला पाहिजे. नुसता बाह्य मिलाफ होऊन उपयोग नाहीं. एकमेकांनीं आपापल्या गुप्त गोष्टी सांगितल्या पाहिजेत. आधीं मी आपल्या गुप्त गोष्टी तुह्मांला सांगतें.

**हरिपंत**:–तुझ्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे हें दाखविण्याकरितां आधीं मी आपल्या गुप्त गोष्टी तुला सांगतों. माझ्याजवळ संपत्ति अपरंपार आहे. मला नुकतीच ती एका भिंतींत पुरून ठेविलेली सांपडली. ती कोणास ठाऊक नाहीं. ती संपत्ति मी एका खोलींत लपवून ठेविली आहे. त्या खोलीची ही किल्ली मी आपल्या बापाच्या विरुद्ध खोटीं खतें करून त्याला मारण्याचा प्रयत्न केला त्या खोट्या खतांसंबंधीं पत्रव्यवहार समोरच्या फडताळांत ठेविला आहे. त्याची ही किल्ली. यशोदाबाई ह्मणून कोणीएक बाई होती तिच्याकडून मीं आपल्या सावत्र भावास मारविलें. आणि नुकतेंच एका वैराग्यास तळघरांत ढकलून मारून टाकिलें.

**वाराणशी**:—दुष्टा तोच वैरागी मी. ( पलंगावरून उडी टाकितो आणि लुगडें आणि चोळी दूर फेंकून देतो. बुचडा सोडून देऊन राख भरतो. नथ टाकितो, मग एक चड्डी घातलेला जवान हरिपंतापुढें उभा राहतो. ) तोच वैरागी मी आहें समजलास. मी

तुझ्याकडे तुझ्या बापाकरितां आलों होतों. तेव्हां तुला ह्मटलें मला खोट्या खतासंबंधाचा पत्रव्यवहार दाखीव. परंतु लोकांत आपला अपराध कळला ह्मणजे आपली बदछान होईल ह्मणून तुला लाज वाटली. चांडाळा आधीं खोटीं खतें करावयास तुला लाज वाटली नाहीं आणि पुढें जनापवादाची लाज वाटूं लागली. अधमा-धमा! तूं मला तळघरांत लोटून दिलेंस,परंतु देव सज्ज-नाचा त्राता आहे त्यानें मला सोडविलें. आणि मी तुझ्या घरांतून बाहेर पडलों तेव्हां तुझा सूड उगवि-ण्याविषयीं मी शपथ घेतली. पुढें सरकारांत नुसता तुझा गुन्हा जाहीर केल्यानेंच गुन्ह्याची शाबीदी होणार नाहीं असें वाटून तुझा खोट्या खतासंबंधीं अंतोपं-ताशीं झालेला पत्रव्यवहार मिळविण्याचा उपाय शोधून काढूं लागलों तो स्त्री वेषाशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून मी स्त्रीचा वेष धारण केला. आणि पुढें काय झालें तें तुला माहीत आहेच.

ह० पं०:--बैरागी बोवा माफ करा, माफ करा.

बिल्वकनाथः--नीचा माफी मागण्यास तुझी जीभ तरी कशी वळते. नरकांतल्या किडया !! तूं जन्मास आल्यापासून एकसारखी पापें करीत आला आहेस. तर तुला मी शपथ घेतली आहे त्याप्रमाणें मरण येणें योग्य आहे [ बि. ना. त्यास पलंगावरून ओढून त्याचे छातीवर पाय देतो. ]

ह० पं०:--क्षमा करा ! क्षमाकरा !!

बिल्वकनाथः--राक्षसा तुला जगांत राहूं दिलें

तर तूं आणखी अशींच अघोर कृत्यें करशील. याला-
ठीं तुझ्या उरांत मी तरवार भोसकतों, ह्मण राम.

हं० प०:-राम. (तरवार मारणार इतक्यांत दारा-
बाहेर)

शिपाई:-दार उघडा! दार उघडा!!

बिल्वकनाथ:-(दार उघडतो)

शिपाई:-हरिपंत कोठें आहेत?

बिल्वकनाथ:-हे येथें आहेत.

शिपाई:-वारणशी कोठें आहे?

बिल्वकनाथ:-ती येथें नाहीं.

शिपाई:-श्रीमंतांच्या हुकुमावरून तुम्हां दोघांस
आम्ही कैद करितों.

बिल्वकनाथ:-खुशाल करा. (जाऊन फडताळां-
तून पत्रव्यवहाराचें दप्तर आणितो.) चला आतां.

शिपाई:-(दोघांस पकडून घेऊन जातात.)

---

## प्रवेश ९ वा.

स्थल—राजवाड्यांतील एक खोली.

बिल्वकनाथ:-मी श्रीमंतांकडे शिपाई पाठविला
तो अजून कां बरें येत नाहीं! श्रीमंत मला आपल्या
भेटीस येऊं देतील कीं नाहीं बरें! मी काल एक चिठ्ठी
नानासाहेबांस उद्यां दुपारीं पुणें येथें सहा वाजतां मुलीं
धावयाचें आहे. आतां जरी श्रीमंतानीं भेटीस मला
येऊं दिलें नाहीं तरी निदान हा पत्रव्यवहार तरी पहावा
म्हणून विनंति करावी नाहींतर बिचारा आपल्या मुला-

च्या हरामखोरीनें व्यर्थ प्राणास मुकेल. काय आणि बाणीचा हा समय आहे. अजून जरी तात्यासाहेबांस सुळीं न देण्याचा हुकूम श्रीमंतांनीं केला तरी देखील त्यांचे प्राण वांचतील. पण बाहेर पावलें वाजत आहेत, बहुतकरून मी निरोप सांगून पाठविलेला. शिपाई असेल.

**शिपाईः**--(येऊन) श्रीमंतांस मी तुमची विनंति कळविली, परंतु त्यांनीं तुम्हांस परत निरोप पाठविला आहे कीं, आतां रात्र फार झाली आहे याकरितां तुम्हांस मुलाखतीस घेऊं देण्यास सवड नाहीं. परंतु उद्यां सकाळीं तुह्मी हरिपंताच्या घरीं इतक्या रात्रीं कां गेलां होतां वगैरे गोष्टींची चौकशी होईल.

**बिल्वकनाथः**--मी सर्व हकीगत सांगण्यास तयार आहें परंतु माझी एक विनंति श्रीमंतांस जाऊन कळवा कीं, मला मुलाखतीस आतां येण्याची जरी मनाई केली आहे तरी निदान आपण हा पत्रव्यवहार तरी वाचून पहावा म्हणजे तात्यासाहेब निरपराधी आहेत अशी आपली खात्री होईल.

**शिपाईः**--बरें (जातो)

**शिपाईः**--(येऊन) श्रीमंतांनीं यांपैकीं एक दोन पत्रें वाचून पाहिलीं त्यावरून तात्यासाहेब निरपराधी आहेत अशी त्यांची खात्री झाली. आणि उद्यां तात्यासाहेबांस सहा वाजतां सुळीं देणार आहेत तर हा स्वदस्तुरचा हुकूम घेऊन जाऊन नारोबा कोतवालास दाखवून त्यांस सोडविण्याबद्दल कामगिरी तुम्हांसच सांगितली

आहे, तसेंच सगुणाबाई आणि रामभट यांसही सोडवि-ण्याविषयीं यांत लिहिलें आहे आणि त्या तिघांस सोड-विल्यानंतर त्यांना घेऊन तावडतोब तुम्ही सातान्यास या असें श्रीमंतांनीं तुम्हांस सांगितलें आहे खालीं घोडा उभा केला आहे त्यावर बसून जा. असें या इकडून म्हणजे तुह्मांस घोडा दाखवितों (जातात).

अंक ४ था समाप्त.

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळः—पुणें शहरांतील सुळीं द्यावयाची जागा.

( एक मोठा सूळ उभा केला आहे. त्याचे दोन्ही बाजूस शिड्या उभ्या केल्या आहेत. पुढचे बाजूस तात्यासाहेब हात बांधलेले उभे आहेत; त्यांचेजवळ सात आठ मांग ढोलकी वाजवीत उभे राहिले आहेत, आणि भोंवतालीं मंडळीची दाटी जमली आहे. )

१ पुरुष—अरेरे ! उगीच प्राणांस मुकत आहे बिचारा.

२ पुरु०—अहो ! त्यांनीं असाच कांहीं अपराध केला असेल म्हणून त्यांना सुळीं चढवीत असतील.

३ पुरुषः—अहो ! तात्यासाहेब किती सद्गुणी ! ते असला अपराध कधींही करणार नाहींत.

४ पु०—( दुसरीकडे ) यांनीं मला एकदां पंधरा रुपये देऊन सावकाराच्या कचाटींतून सोडविलें होतें ! अरेरे ! !

५ पु०—हाय ! हाय ! हाय !

सारे नागरिकः—हाय ! हाय ! ! हाय ! ! हाय ! ! !

तात्यासाहेबः—शिव शिव ! ! देवा ' काय प्रसंग हा माझ्यावर त्वां आणला. ज्याप्रमाणें आकाश अगदीं निरभ्र असून सूर्याचा प्रकाश जिकडे तिकडे पडलेला असावा. इतक्यांत तें मेघांनीं एकाएकीं आच्छादित व्हावें आणि वाऱ्याच्या सपाट्यानें झाडें घरेंदारें वगैरे

यांची वाताहत व्हावी त्याप्रमाणें आमची स्थिति झाली झाली आहे. आज पधरा दिवसांमागें आम्ही किती सुखी होतों ? तेव्हां जर कोणी आम्हांस सांगितलें असतें कीं, थोडक्याच दिवसांनीं तुमचें कुटुंब देशो-धडीस लागेल तर मला तें कधींतरी खरें वाटलें असतें का ! परंतु, शिव शिव ! गोष्ट तर तशीच घडून आली. मी आतां थोडक्याच काळानें या जगांतून निरपराधी असतांही नाहींसा होणार. माझ्या स्त्रीची पुढें काय वाट होईल ? शिव शिव ! रामभट आतां कोठें असतील ! हाय हाय ! !

**सारे लोकः**—हाय ! हाय !

**सुळीं द्यावयाचे कामावरील कामदारः**—तमाम लोक हो ! जे गृहस्थ आतां सुळीं दिले जाणार आहेत त्यांचा गुन्हा काय तो तुम्हांस कळला म्हणजे, तुम्ही त्याप्रमाणें आचरण करणार नाहीं असें समजून श्रीमतांनीं या गृहस्थांचा गुन्हा वगैरे जाहीर करा असें मला फर्माविलें आहे. त्यावरून त्यांचें नांव, गांव गुन्हा वगैरे तुम्हांस जाहीर करितो

हे गृहस्थ सातारचे राहणारे. यांचें नांव बाळकृष्णपंत उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर. हे तेथें व्याजबट्टा करून उदरनिर्वाह करीत असत. एके दिवशीं द्वारकानाथ म्हणून साताऱ्यास राहणाऱ्या एका गुजराथी ब्राह्मणानें सात वर्षांमागें आपल्या मुलीच्या लग्नाकरितां दहा हजार रुपये तात्यासाहेबांपासून उसने काढिले. आणि सात वर्षांनीं फडकरून टाकीन अशा मजकुराचें एक बनावट खत कैदी मजकूर तात्यासाहेब यांनीं

तयार केलें. आणि त्याच्यावर द्वारकानाथाची खोटी सही घातली. आणि तें खत दहा हजार रुपयांची फेड करून घेण्याकरितां सरकारांत जाहीर करणार अशी बातमी श्रीमंतांस खासगी रीतीनें कळल्यावरून त्यांनीं तात्यासाहेबांस पकडविलें आणि घरांत शोध करविला. तेव्हां बनावट खतें एका फडताळांत सांपडलीं. त्या गुन्ह्यावरून गुन्हेगार मजकुरास सुळीची सजा त्यांनीं फर्माविली. ती सातारा येथें कांहीं दिवसांमागें अमलांत यावयाची होती. परंतु गुन्हेगार तुरुंगांतून फरारी झाला. पुढें तो उत्तर हिंदुस्थानांत जात असतां पकडला गेला. तो आज सुळीं दिला जात आहे. हें सरकारहुकुमावरून तमाम लोकांस जाहीर केलें आहे. मांगानों! आपलें काम करा.

**पहिला मांग**.—अरे ए हाप्या! घाल ही काळी टोपी येचे तोंडावर. मी मागून हिचे बंध बांधतों.

( इतक्यांत बिल्वकनाथ घोडा भरधांव टाकीत येतो. )

**बिल्वकनाथः**—थांबा! थांबा! थांबा! श्रीमंतांनीं तात्यासाहेबांस निरपराधी ठरवून मुक्त केलें आहे. हा पहा त्यांच्या हातचा स्वदस्तुर. ( कामगाराच्या हातांत बाजीरावांचें पत्र देतो, नंतर तात्यासाहेबांस ) तात्यासाहेब! मी अगदीं वेळेवर आलों म्हणून बरें झालें नाहीं तर खचित घात झाला असता. ईश्वरानें मोठी खैरात केली. ( तात्यासाहेबांस भेटतो ) तुमच्या पत्नीस आणि रामभटास देखील सोडविण्याविषयीं नारोबा कोतवालास यांतच हुकूम आहे.

**कामदार:**—( पत्र वाचतो ) रा. रा. नारोबा कोतवाल अथवा त्यांचे हाताखालील जे कोणी कामदार तात्यासाहेबांस तुरुंगांत ठेवण्याचे कामावर असतील त्यांस असा हुकूम करण्यांत येतो की, तुह्मी तात्यासाहेबांस एकदम सोडून द्यावें, कारण आह्मी पुष्कळ बारीक चौकशी केली त्यावरून तात्यासाहेबांनीं खोटीं खतें केलीं नाहींत अशी आमची खातरी झाली आहे. त्यांची पत्नी सौ. सगुणाबाई आणि त्यांचा विश्वासू कारकून रामभट या दोघांची सुटका दिरंग न लावतां तावडतोब व्हावी.

सही—बाजीराव पेशवे.

**सर्व नागरिक**—(आनंद प्रदर्शित करतात.)

**कामगार**—तात्यासाहेब, मी हें पत्र वाचिलें तें तुह्मी ऐकिलेंच. आतां हें पत्र घेऊन सगुणाबाईस आणि रामभटास सोडवून आणण्याकरितां चला आपण नारोबा कोतवालाकडे जाऊं-[नागरिकांस] नागरिक हो! तात्यासाहेब निरपराधी ठरले हें या पत्रावरून तुह्मांस कळलेंच आहे.

**बिल्वकनाथ:**—चला तर नारोबा कोतवालाकडे.

[जातात.]

---

## प्रवेश २ रा.

स्थळ—नारोबा कोतवालाचे घरांतील एक खोली.

[ नारोबा कोतवाल पलंगावर बसला आहे. ]

**नारोबा कोतवाल:**—प्रिये ! तुला मीं लहानपणीं जेव्हां पाहिलें, तेव्हांपासूनच तुझ्या लावण्यानें

मला तुझा दास करून सोडलं आहे. तेव्हां तूं जितकी सुंदर होतीस त्याहीपेक्षां आतां तुझें सौन्दर्य वाढलें आहे. तू माझ्या डोळ्यापुढें असलीस किंवा नुसती तुझी आठवण झाली ह्मणजे माझे अंतःकरणांत कांहीं विलक्षण प्रेमाच्या लाटा उत्पन्न होतात. तुझ्या लहानपणापासून तुजविषयीं माझे मनांत जी प्रीति उत्पन्न झाली, ती अजून तशीच कायम आहे. तुझ्या बापास मीं पुष्कळ विनविलें कीं तू आपली मुलगी मला दे. परंतु सर्व व्यर्थ झालें. त्यानें तुला तात्यासाहेबांस दिलें तेव्हांपासून तूं कोणत्या रीतीनें मला प्राप्त होशील—( बोलू नको मधें) तेव्हांपासून तू कोणत्या रीतीनें प्राप्त होशील याचा विचार मी करीत होतों तों सुदैवानें अनायासानें प्रथम तुला माझ्या हवालीं केलं. तेव्हां मीं तुझी फार विनवणी केली, परंतु तूं मला वश झालीस नाहीं. आणि शेवटीं माझ्या हातावर तुरी देऊन पळून गेलीस, परंतु आतां तू माझ्या तावडींतून कशी बाहेर पडतेस तें पाहूं प्रिये! कांहीं करून माझ्या बरोबर राहण्यास राजी हो. ह्मणजे मी कृतकृत्य होईन.

सगुणाः—महाराज! मला भ्रष्ट केल्यानें आपणास काय मिळणार आहे. इंद्रानें अहिल्येला भ्रष्ट केल्यामुळें त्याच्या अंगास हजार भोकें पडलीं. रावणानें सीतेचा अभिलाष धरून तिला हरण केलें तेणेंकरून त्याचा, त्याच्या कुळाचा, त्याच्या राज्याचा विध्वंस झाला, इत्यादि पुराणांतल्या गोष्टी आपणास माहीत आहेतच. तर महाराज सोडून द्या मला.

नारोबा कोतवालः—प्रिये पुराणांतल्या गोष्टी

पुराणांत. खुद्द पुराणिकबोवा तरी तुझ्यासारखी स्त्री पाहिल्यावर पुराणांतल्या भाकडकथा कितपतशा मनांत आणीत असतील कोण जाणे [ जवळ जाऊं लागतो].

**सगुणाबाई**:—महाराज मी तुमच्या पायां पडतें. मला जाऊं द्या आणि माझ्या यजमानांची काय स्थिति आहे, ती मला सांगा, म्हणजे माझ्या चित्ताला थोडेंसें समाधान वाटेल.

**नारोबा कोत०**:—प्रिये, तुझ्या पतीची काय स्थिति आहे म्हणून तूं विचारतेस, तर ऐक. त्यांना आज पांच वाजतां सुळीं द्यावयाचें होतें. तर एव्हांना ते या जगांतून नाहींसे झाले असतील. त्याचेमागें तुला कोणी त्राता राहिला नाहीं यासाठीं मजबरोबर राहण्यास तयार हो.

**सगुणाबाई**:—चांडाळा, मला माझे पतीचे मृत शरीरावर पडून प्राण सोडण्यास जाऊं दे. [ दारापाशीं जाते, इतक्यांत नारोबा कोतवाल तिचा हात धरतो. ] तुझ्या सारख्या पुरुषांनीं लढाईमध्यें आपलें शौर्य दाखवावें. एखाद्या खोलींत कोंडलेल्या अबलेस छळण्यांत दाखवूं नये. ( तिरस्काराच्या मुद्रेनें पाहत उभी राहते.)

**नारोबा कोतवाल**:—प्रिये, यावेळीं तूं माझी कितीही हेळणा केलीस आणि मजवर कितीही रागावलीस तरी सारें व्यर्थ होणार आहे. (तिला धरतो आणि पलंगावर टाकतो.)

**सगुणाबाई**:—( किंकाळी ठोकते ).

**नारोबा कोतवाल**:—प्रिये ! ( हंसून ) आतां कोठें पळून जाशील ? येथें तूं रडून आरडून कितीही आक्रो-

श केलास तरी सर्व निष्फळ होणार आहे. ( इतक्यांत बिल्वकनाथ बाहेरून दारास लाथ मारून तें फोडून आंत येतो. )

**बिल्वकनाथः**--हरामखोरा कोतवाला ! सोड त्या स्त्रीला. नीचा, त्या भाउलीला तूं स्पर्श करून विटाळ करितोस काय. ( नारोबा कोतवालास धरतो. ) हें पहा श्रीमंतांचें खुद्द स्वदस्तूरचें पत्र. यामध्यें सगुणाबाईस सोडवावी असें लिहिलें आहे.

( नारोबा कोतवाल वाचतो व सुस्कारा टाकतो. )

(सगुणाबाई तात्यासाहेबांस प्रेमानें भेटते व अश्रु ढाळते).

**तात्यासाहेबः**--प्रिये, हे पाहिलेस वैरागी बिल्वकनाथ. यानीं त्वरा केली नसती तर मी खचित प्राणांस मुकलों असतों आणि तुही अबला या [ नारोबा कोतवालाकडे बोट दाखवून ] निमकहरामाच्या नीचकर्मानें भ्रष्ट झाली असतीस; पण देवानें खैरात केली म्हणून हा सोन्याचा दिवस आपणांस पाहावयास सांपडला. बरं, चल आतां. सातान्यास बिल्वकनाथाच्या बरोबर श्रीमंतांनीं आपणास बोलाविलें आहे, तिकडे आपण जाऊं. आपणावरचा अनर्थ कसा टळला वगैरे सर्व गोष्टी मागाहून कळतील.

( सगुणाबाई बिल्वकनाथाच्या पायां पडते. )

**सगुणाबाईः**--तुमच्यामुळेंच आम्हांवरचें हें अनर्थ टळेल.

**बिल्वकनाथः**--बाई! ईश्वरकृपेनें सर्व घडलें यांत मीं तें काय केलें.

## प्रवेश ३ रा.

### स्थळ——राजवाड्यांतील एक खोली.

( हरिपंत एका घोंगडीवर पडला आहे. )

**हरिपंत**:—हायहाय ! लहानपणीं वाईट संगति लागल्यामुळें किती पापें या अधमानें केलीं ? त्या अंतूची संगत लागल्यापासूनच मीं अभ्यास करीनासा झालों. पुढें त्याच्याच संगतीनें ( शहारे देऊन ) दोन वर्षांच्या माझ्या भावास मीं मारविलें. पुढें मीं नीचानें घरचे पुष्कळ रुपये लांबविले, तेंही त्याचेच संगतीचें फळ. त्यानेंच भर दिल्यावरून मी खोटीं खतें करण्यास तरी राजी झालों. शिव शिव ! काय अनर्थ मीं करून सोडले. आईला पकडण्याकरितां मीं अंतूस पाठवून तिला धरविली. हाय हाय ! लोकांस आपला अपराध कळेल म्हणून त्या वैराग्यास मारण्याचा प्रयत्न केला. पशूंत आणि माझ्यांत अंतर काय उरलें आहे! कारण, बाबा इतके संकटांत पडले असतां देखील स्त्री-सुखास उद्युक्त होण्यास मला पाप्याला लाज वाटली नाहीं. धिक् माझें जिणें ! पण माझ्या अपराधाबद्दल त्या वैराग्यानें मला योग्य शासन केलें. जगास माझा अपराध आतां कळला. हाय हाय ! पहिल्यापासूनच मीं अंतूची संगत धरली नसती तर मजवर हे अनर्थ कशानें बरें ओढवले असते! अंतू किती कठोर अंतःकरणाचा आहे ! मी येथें येऊन पडल्यास सबंध एक दिवस झाला, परंतु अजूनपर्यंत तो माझ्या समाचारास देखील आला नाहीं. पण त्याला माझी काय पर्वा ? तो मा-

ञा मित्र नव्हे, माझ्या पैशाचा मित्र आहे. देवा! पश्चात्तापानें माझें अंतःकरण अगदीं होरपळून गेलें आहे. मागचीं पंधरा वर्षें मला जर कोणी पुन्हा रहाण्यास देईल तर तीं मी कशीं सदाचारांत घालवीन. किंवा जर कोणी मला इतःपर जिवंत ठेवील तर माझी वर्तणूक मी किती आनंदानें सुधारीन. पण हें म्हणणें अगदीं व्यर्थ आहे. आपर्यंत मीं चांगल्या रीतीनें वागण्याचा निश्चय कितीदां तरी केला? पण सारें व्यर्थ गेलें. माझ्यामध्यें मनोनिग्रहच नाहीं. हाय हाय! बरें, पण जिवंत राहून अशा यातना सदोदित भोगीत बसण्यापेक्षां मरणच आलेलें बरें; पण तें यावयाचेपूर्वीं बाबांची भेट होईल तर त्यांच्या पायांवर लोटांगण घेऊन त्यांची क्षमा मागून मोठ्या सुखानें प्राण सोडीन. पण, हाय! हाय! इतकें कोठचें माझें नशीब? आतां माझी व बाबांची कसची गांठ पडते? अरेरे! किती मी हतभाग्य! बाबा! बाबा! क्षमाकरा! क्षमाकरा! आई! क्षमाकर! राम! राम! [ प्राण टाकतो. ]

( पडदा हळू हळू पडतो )

---

## प्रवेश ४ था.

[ तात्यासाहेब आणि सगुणाबाई राजवाड्यांतील एका खोलींत दुःख करीत बसलीं आहेत. ]

**तात्यासाहेबः**—हाय हाय! देवा माझा हरि या जगांतून नाहींसा झालाना! मला मरणापासून मुक्त के-

लेंस तें हा पुत्रशोक देण्याकरितांच कारे? मी सुळीं जाऊन मरण पावलों असतों तरी पुरवलें असतें, परंतु ह्मातार-पणीं पुत्रवियोग पाहणें नको! शिव शिव! (रडतो) माझ्या चिमुकल्या सदाशिवाला लहानपणींच चोरांनीं चोरून नेलें आणि हरिहि नाहींसा झाला! हर! हर! ह्मातारपणीं पुत्रदर्शनाचें सुख या डोळ्यांस मिळण्याचें माझ्या नशीबींच नाहीं. (रडतो) शिव! शिव! हरीचें अंतकाळीं देखील मला तोंड पहावयास सांपडलें नाहीं! अरे, हरि जरी दुराचरणी होता तरी तसा देखील जरी पुत्र मला ह्मातारपणीं असता, तरी मी खुषीनें पत्करला असता. परंतु आतां मी निपुत्रिक झालों. (रडतो) मला पुत्र नाहीं तर या जगांत वांचून तरी काय करावयाचें आहे? ही अपार संपत्ति घेऊन तरी मला आतां काय करावयाचें आहे? प्रिये, आपणांला या संसारांत आतां सुख मिळून कांहींच उरलें नाहीं तर सर्व द्रव्य दानधर्म करून टाकून काशीस जाऊन गंगेमध्यें प्राणत्याग करावा असें मला वाटतें.

**सगुणाबाई**:--हाय हाय! आपलें नशीबच फुटलें! आपल्या कपाळीं जर पुत्रसुखच नाहीं तर तें कोठून मिळणार? आपणांला जगून तरी आतां काय करावयाचें आहे? तर आपण जिकडे जाल तिकडे मी यावयास तयार आहें. (खिजमतगार येतो)

**खिजमदगार**:--रावसाहेब, श्रीमंतांनीं आपणां दोघांस समोर दिवाणखान्यामध्यें बोलाविलें आहे.

**तात्यासाहेब**:--बरें, येतों ह्मणून सांग श्रीमंतांस. हे आलोंच आह्मी तुझ्या पाठोपाठ ह्मणून समज. (खि-

जमतगार जातो. ) प्रिये, अतां शोक आवर. तुला रडतांना मीं पाहिलें ह्मणजे मला रडें कोसळून येतें ! आपले नशीबींच पुत्रसंतान नाहीं तर रडून तरी काय होणार; चल तर आतां. श्रीमंतांनीं आपणांस हुजूर बोलाविलें आहे तिकडेसच जाऊं. [ जातात. ]

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळ**—बाजीरावाचे वाड्यांतील दिवाणखाना.

[बाजीराव पेशवे लोडाशीं बसले आहेत. तात्यासाहेब, सगुणाबाई, रामभट, बिल्वकनाथ, खिजमतगार वगैरे)

**बाजीराव**:—तात्यासाहेब, तुमची आणि तुमच्या पत्नीची हकीकत तुम्ही सांगितली त्यावरून ती आह्मांस कळली. सगुणाबाईस आमच्या हरामखोर नारोबाकोतवालानें कसें छळलें तें सर्व आह्मांस कळलें. तात्यासाहेब, तुह्मी निपराधी असतांनाही तुह्मांस आणि तुमच्या कुटुंबास इतकीं संकटें भोगावीं लागलीं ह्मणून आह्मांस फार वाईट वाटतें. हा पत्रव्यवहार तरी तुमच्या नशीबानें आह्मांस पहावयास सांपडला ह्मणून बरें झालें, नाहींतर तुह्मी प्राणास मुकलां असतां. बरें ज्या पत्रांचे योगानें तुमची सुटका झाली त्यांपैकीं एक दोन वाचून तर पहा.

**तात्यासाहेब**:-बरें. ( वाचतात )

रा. रा. हरिपंत यांस—तुह्माआह्मांमध्यें ठरल्याप्रमाणें आपण जें खोटें खत केलें त्याचेवर द्वारकानाथाच्या सहीप्रमाणें सही भिकाजीपंताकडून घेत-

ली आहे. तिकडील मजकूर आपले विश्वासू नोकर गोविंदपंत यांजबरोबर लवकर कळवा.

पुणें, मिति— सही—अंतोपंत.

ताजाकलम—मी लवकरच सातान्यास येणार आहें.

बा:-अशाच प्रकारचीं हीं खालीं पत्रें आहेत. बरें पण ज्याणें तुमचे प्राण वांचविण्याचें यश घेतलें त्या वैराग्यास त्याची हकीकत आतां आपण विचारूं (बिल्वकनाथास) बिल्वकनाथ, तूं आमचें पत्र फार जलदीनें पुण्यास घेऊन गेलास ह्मणून तात्यासाहेबांचे प्राण वांचले, आणि सगुणाबाई नारोबाच्या नीच कृत्यानें भ्रष्ट व्हावयाची चुकली, त्याबद्दल त्यांचे तर्फेनें मी तुझे आभार मानतों. परंतु तू कोण आहेस आणि खोट्या खतांच्या संबंधाचा पत्रव्यवहार तुझ्या हातीं कसा लागला वगैरे सर्व हकीकत आह्मांस आणि या सर्व मंडळीस कळीव.

बिल्वकनाथः—होय, सरकार. मी उत्तरहिंदुस्थानांत मकोणा या गांवाचा राहणारा आहें. माझा बाप माझ्या लहानपणींच लढाईवर गेला तो परत आला नाहीं असें माझी आई मला सांगते. माझा संभाळ माझ्या आईनें केला. तिनें मला एका पंतोजीकडून लिहावयास आणि गावयास शिकविलें. मग पुढें मी बारा वर्षांचा असतांनाच एका श्रीमंत सावकाराचे घरीं कारकून राहिलों. याप्रमाणें कांहीं वर्षें लोटलीं. एके दिवशीं माझी ह्मातारी आई मला जवळ बोलावून ह्मणाली, अरे मी आतां ह्मातारी झालें, मला मरण केव्हां येईल याचा नेम नाहीं, तर एक गोष्ट करावयाची आहे

ती केल्याशिवाय मला स्वस्थपणें मरण यावयाचें नाहीं. ती गोष्ट काय आहे हें मी तुला सांगत नाहीं, पण तुझें नशीब जर असेल तर तुला ती कळून येईल आणि नसलें तर ती माझ्याजवळच राहील. मी तुला एक गुप्त मजकुराचें पत्र देतें तें घेऊन तूं पुण्यास किंवा सातान्यास ( जेथें श्रीमंत पेशवे असतील तेथें ) जा आणि त्यांना तें दाखीव आणखी ही आंगठी देखील दाखीव. परंतु ह्या जिनसा अगदीं गुप्त ठेव कोणास कोणत्याही प्रसंगीं त्या दाखवूं नकोस. असें ह्मणून तिनें मजजवळ एक पत्र आणि एक आंगठी दिली, आणि ह्मणाली तूं वैराग्याच्या वेषानें जा ह्मणजे वाटेंत कांहीं अडचणी आल्याशिवाय राजधानीस थेट जाऊन पोंचशील. तिनें माझ्याबरोबर एक गडी माझ्या सोबतीस दिला. मग आह्मी दोघे वैराग्याच्या वेषानें पुण्यास यावयास निघालों. वाटेंत येतां येतां पुण्याचे शेजारीं या तात्यासाहेबांची आणि माझी वडगांव येथें गांठ पडली, तेथें नारोबाकोतवालानें येऊन तात्यासाहेबांस कशी जखम केली वगैरे हकीकत त्यांनीं आतांच आपणांस नमूद केली आहे. ह्मणून त्याविषयीं कांहीं न बोलतां मी आपणांस इतकेंच सांगतों कीं, तेथें तात्यासाहेबांची जखम मी आपल्याजवळ असलेल्या मुळीनें बरी केली. मग मीं त्यांना आपली हकीकत विचारिली. ती सांगतांना आपल्या मुलानें खोटीं कृत्यें केलीं असावींत असें त्यांनीं मला कळविलें. मग त्यांनीं मला बक्षिसादाखल एक आंगठी दिली. मग ते सारे नारोबाच्या व त्याच्याबरोबर असलेल्या शिपा-

यांच्या घोड्यांवर बसून पळून गेले. दुसऱ्या दिवशीं पुणें शहरांत येऊन मीं शोध केला तेव्हां असें कळलें कीं, आपण कांहीं दरबारी कामाकरितां साताऱ्यास गेलां. ह्मणून मी आणि माझा मित्र असे दोघे साताऱ्यास आलों, आणि हुजुर मुलाखतीस ज्या दिवशीं जावें असा आह्मीं दोघांनीं इरादा केला होता त्याचे आदले दिवशीं हरिपंतास रस्त्यांत पाहिलें आणि त्याचा आणि तात्यासाहेबांचा तोंडवळा सारखा आहे, असें पाहून मीं असें ताडलें कीं, हेच तात्यासाहेबांचे पुत्र असावेत. मग मीं रात्रीं त्यांच्या देवडीसमोर निजावयास जागा मागून घेतली. आणि पुढें मध्यरात्रीच्यावेळीं शेजारच्या भिंतीपलीकडे हरिपंत आणि त्यांचे मित्र असतांपत यांचा खोट्या खतांच्या संबंधाच्या पत्रव्यवहाराविषयीं कांहीं संवाद ऐकिला. त्यावरून तात्यासाहेब निरपराधी आहेत, अशी माझी खात्री झाली, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं हरिपंताच्या मुलाखतीस गेलों. त्यांच्याजवळ मीं खोट्या खतांच्या संबंधाचा पत्रव्यवहार मागितला, परंतु त्यांनीं मला फसवून तळघरांत लोटून दिलें. तेथून मी सुदैवानें बाहेर पडलों आणि मग कोणत्या रीतीनें हरिपंतास त्याच्या दुष्ट कृत्याबद्दल पारिपत्य करावें याचा विचार करितां करितां वेष घ्यावा असें मला जरूर वाटलें. ती ओंगळ आणि नामर्दपणाची हिकमत लढविण्यास माझें मन घेईना, परंतु निरुपायास्तव मग मीं स्त्रीवेष घेऊन हरिपंतापर्यंत मोठ्या युक्तीनें प्रवेश करून घेऊन त्याच्या तोंडानें पत्रव्यवहार कोठें आहे वगैरे ऐकि-

त्याबरोबर त्वेष टाकला आणि हरिपंतास त्यांच्या नीच कृत्यांबद्दल देहांत शिक्षा करणार होतों इतक्यांत हुजुराकडून शिपाई आले. यापुढची हकीकत आपणांस माहीत आहेच.

**बाजीराव**:-बिल्वकनाथ, तुझ्या चातुर्याबद्दल तुझी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. बरें, त्या ब्रह्मचाऱ्यानें आह्मांस जें पत्र लिहिलें आहे तें इकडे आण पाहूं. (बिल्वकनाथ पत्र देतो तें घेऊन वांचून) तात्यासाहेब तुह्मी आपल्या मुलास कडकडून भेटा. हा जो बैरागी तुमचेपुढें उभा आहे तो तुमचा मुलगा.

**तात्यासाहेब**:--(स्तब्ध उभे राहतात.)

**बाजीराव**:--तुह्मीं हें पत्र वाचलेंत ह्मणजे सर्व गोष्टींचा खुलासा होईल.

**तात्यासाहेब**:-(पत्र वाचतात.)

श्रीमंत राजवर्य बाजीराव साहेब पेशवे यांस विज्ञापना अशी आहे कीं, मी पंधरा वर्षांमागें सातारा येथें राहत असें. तेथें बाळकृष्णपंत ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्मणून कोणी गृहस्थ राहत असत. त्यांच्या दोन वर्षांच्या मुलास आपण मारून टाकावें असें त्यांचा वडील मुलगा हरिपंत याच्या मनांत येऊन त्यानें त्याची मुंडी मुरगळण्याचें काम मजकडे सांगितलें. परंतु त्या बाळाची मला दया येऊन त्याला मीं घरांत गुप्तपणें ठेविलें. मग कांहीं दिवसांनीं तेथें राहणें ठीक नाहीं, असें समजून उत्तर हिंदुस्थानांत मकोणा गांवीं येऊन त्या बाळासह राहिलें, आणि त्याचा चांगला सांभाळ केला. आणि हरिपंतानें मला

माझ्या कृत्याबद्दल दहा हजार रुपये दिले होते त्यावर इतके दिवस गुजारा केला. परंतु ह्यातारपणीं आई-बापांस पुत्रवियोग घडविल्याचें पाप माझ्या अंतःकरणांत डवचूं लागलें त्यावरून हें पत्र आपणांस लिहिलें. तात्यासाहेब कोल्हाटकर किंवा त्यांचा कोणी नातलग जिवंत असेल तर हें पत्र घेऊन येणारा मुलगा त्याचे स्वाधीन करावा. जर कोणी नसेल तर हा मजकूर त्यास न कळवितां त्यास परत पाठवून द्यावें या पत्रासोबत एक आंगठी पाठविली आहे, ती ह्या मुलास मारावयाकरितां जेव्हां हरिपतानें त्याला माझे स्वाधिन केलें त्यावेळीं त्याचे हातांत होती. ती खुणेदाखल पाठविली आहे, कळावें.

सही—यशोदाबाई कोम नारोपंत जोशी.

**तात्यासाहेब**.—आंगठी कोठें आहे पाहूं?

**बिल्वकनाथः**-( आंगठी पुढें करितो. )

**तात्यासाहेबः**—( आंगठी घेऊन पाहून आणि ओळखून बिल्वकनाथास कंवटाळतो. ) सदाशिवा, तूं आमच्या नशीबानें आह्मांस प्राप्त झालास. ( अश्रु ढाळितो. ) देवा! तुझी लीला अगाध आहे. माझा सदाशीव मला पुन्हां मिळवून दिलास! सदू! जा आपल्या आईस भेट.

**सगुणाबाईः**-ये बाळा सदू! ( कंवटाळते ) खचीत आमेचें नशीब बळकट ह्मणूनच तूं आमच्या पुन्हां दृष्टीस पडलास. लहानपणीं तुझ्या उजव्या कुशीस एक तुळशीपत्राची खूण होती ती पाहूं. (पाहून ) माझाच रे सदू तूं, माझाच. ( कवटाळून अश्रू ढाळिते. )

**बाजीराव**:–सगुणाबाई, तुह्मांस छळिल्याबद्दल नारोबा कोतवालास काय शिक्षा करावीसें तुह्मांस वाटतें.

**सगुणाबाई**:—यजमान आणि मी सर्व संकटांतून पार पडून एकमेकांस भेटलों. आमचा सद्गु पुन्हा आ- ह्मांस मिळाला, या आनंदांत नारोबाविषयीं माझ्या म- नांत कांहींदेखील राग उरला नाहीं.

**बाजीराव**:—पण, आह्मी त्यास ज्या कामावर नेम ला होता त्यामध्यें त्यानें अशी हरामखोरी केली ह्मणून त्यास आमच्या मुलखांतून हद्दपार करून त्याची सर्व जिंदगी जप्त केली पाहिजे- येश्या,

**येश्या**:—(येऊन मुजरा करून )जी सरकार.

**बाजीराव**:–येश्या, लक्ष्मणराव फौजदारास सांग जा कीं तावडतोब पुण्यास जाऊन नारोबा कोतवालास हद्दपार करावें आणि त्याची सर्व चीजवस्त सरकारांत जप्त करून टाकावी.

**येश्या**:–(मुजरा करून ) जी सरकार. (जातो).

**बाजीराव**:–तात्यासाहेब, तुह्मांला कांहीं मागाव- याचें असेल तर मागा.

**तात्यासाहेब**:–हुजूरपाशीं माझी एक विनंती आहे, माझा मुलगा हरि यानें जरी अह्मांस इतक्या संकटांत घातलें तरी त्याचेविषयीं आमचे मनांत कांहीं राग नाहीं. कारण (डोळयांस पाणी आणून ) तो या जगांतून नाहींसा झाला आहे. आतां पितृप्रे- मानें मीं आपल्यापाशीं हें मागतों कीं त्याचा अंतो- पताशीं झालेला हा (बोट दाखवून) पत्रव्यवहार जाळून

...यो दुष्कृत्यांचा पुरावा नाहींसा करून ...आणि ही सर्व हकीकत छपवून टाकावी.

बाजीराव:-बरें आहे. सदू, हा पत्रव्यवहार ... पाहूं.

...( फाडतो. )

...यासाहेब:-ज्या अपराधांत हरि सांपडला त्याच अपराधांत अंतोपंतही गुंतला असल्यामुळें त्यालाही कांहीं सजा करूं नये अशी हुजूरपाशीं माझी आणखी एक विनति आहे.

**बाजीराव**:-तात्यासाहेब, अंतोपंत वदचालीचा मनुष्य आहे त्याअर्थी त्याला सातान्यासारख्या शहरांत राहूं दिला तर अशींच दुष्कृत्यें तो पुन्हां करील, यासाठीं त्याची चीजवस्त कांहीं जप्त न करितां त्याला आमच्या मुलुखांतून हद्दपार करवितों. ( सदूस ) सदू, तुला कांहीं मागावयाचें असल्यास माग.

**सदू**:-खाविंद, मला दोन गोष्टी आपल्यापाशीं मागावयाच्या आहेत. माझ्या पालन करणारीस माझा प्राण हरण करण्याच्या इरादाबद्दल माफी देऊन पुन्हां सातान्यास येण्यास मोकळिक द्यावी. म्हणजे ती आमचे घरीं म्हातारपणीं सुखानें प्राणत्याग करील.

**बाजीराव**:-बरें आहे. तुझी दुसरी विनंती ऐकूं दे.

**सदू**:- दुसरी विनंति अशी आहे कीं माझ्या आईबापांची अल्प सेवा माझ्या हातून घडली म्हणून आपण आपल्या हातानें मला शाबासकी द्यावी—

( जवळ जाऊन पाठ पुढें करतो. )

**बाजीराव**:-( पाठ थोपटतो आणि शेवटचा हात मारतो. ) कां सदू, पुरे झालीना शाबासकी?

**सदू**:--पुरे झाली सरकार.

**बाजीराव**:-तात्यासाहेब—आणखी कांहीं प्रिय मागावयाचें असल्यास मागा.

**तात्यासाहेब**:-सरकार, मी आणि माझें कुटुंब संकटांतून मुक्त झालों. आमचा पुत्र आह्मांस पुन्हां भेटला. हरीच्या गुन्ह्यांचा पुरावा नाहींसा झाला. आतां याउपर प्रिय तें काय मागावयाचें राहिलें आहे? तथापि खाविंद, ज्याअर्थी आपण विचारतां त्याअर्थी मी सर्व प्रजेच्या तर्फेनें हें मागतोः—कीं आपण सर्व प्रजेस अशाचप्रकारचा न्याय देऊन तिला नेहमीं संतुष्ट ठेवावें, तसेंच दक्षिणा वगैरे देऊन ब्राह्मणांस नेहमीं संतुष्ट ठेवावें. आणि यज्ञ वगैरे करून इन्द्रादि देवतांस प्रसन्न करावें.

**बाजीराव**:-बरें आहे. असें करावयास झटणें हें तर आमचें पहिलें कर्तव्य होय.

( पडदा हळू हळू पडतो )

समाप्तः